म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. १४७६

# महाराष्ट्रीय मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी.

लेखक :—
वा. मा. गोंधळेकर

IRBK-0101476

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. ८२

विषय बाल...
वा. नं. १३६



१

— शं. भा. गोंधळेकर

ओ.क्र. १७५६

महाराष्ट्रीय

# मोठ्या लोकांच्या छोटया गोष्टी

[ सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति ]

## पुस्तक पहिलें

शं. भा. गोंधळेकर, एम्. ए., बी. टी.

आजचे लोकनायक, जगांतील मुलांच्या मौजा इ.
पुस्तकांचे लेखक

म.ग्रं.सं. ठाणे.

उद्धरेदात्मनात्मानम्
टीचर्स पब्लिशिंग हाउस, पुणे २

क्र. १७५६

आ.वा.

किंमत ६

IRBK-0101476

IRBK-0101476

# प्रस्तावना

कवि, कादंबरीकार व नाटककार यांच्या कार्यांत कल्पनाशक्ति व प्रतिभा यांची जितक्या उत्कटतेनें जरूरी असते तितकी इतिहासकार किंवा चरित्र-कार यांच्या कार्यांत नाहीं हें मान्य केलें तरी दुसऱ्या एक दृष्टीनें ह्या दोघांवर जास्त महत्त्वाची जबाबदारी असते. ललितवाङ्मयांत विषयाला परिपोषक असलेल्या गोष्टी कल्पनेच्या जोरावर उपलब्ध करतां येतात, पण वास्तव वाङ्मयांत सत्यदर्शनाच्या म्हणजे यथावत् वस्तुदर्शनाच्या मर्यादा पळावयाच्या असल्यामुळें लेखकाचें काम अवघड होतें. वास्तवलेखनाचें आत्यंतिक उदाहरण म्हणजे आपली दैनंदिनी होय. ती लिहितांनासुद्धां अनेक गोष्टी कमी महत्त्वाच्या अगर अप्रासंगिक म्हणून त्याज्य ठरवाव्या लागतातच. तेव्हां निवड करण्यांत लेखकाचें चातुर्य दिसून येतें. अर्थातच संक्षिप्तरूपानें चरित्रें लिहिण्याचें काम करण्यास लेखक चांगलाच कुशल असला पाहिजे. नाहींतर नायकाविषयीं कथन केलेल्या सर्व गोष्टी सत्य असल्या तरी एकंदर स्वभावचित्र विकृत होण्याची फार भीति असते. एखाद्या मोठ्या चित्रावरून त्याची लहान प्रमाणांत प्रत काढावयाची झाल्यास प्रत्येक अवयव त्याच प्रमाणांत लहान केला पाहिजे. त्याचप्रमाणें मोठ्या ग्रंथरूपानें प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचा प्रतिपाद्य विषय थोडक्यांत मांडावयाचा झाल्यास संक्षेपाचें प्रमाण प्रथमपासून शेवटपर्यंत तेंच राहील ही खबरदारी लेखकानें घेण्यास हवी.

असो. आमच्या मतें श्रीयुत गोंधळेकर यांनीं ह्या पुस्तकांत केलेला उपक्रम जितका यशस्वी तितकाच अभिनंदनीय आहे. इंग्रजी वाङ्मयांत ए. जी. गार्डिनर (A. G. Gardiner) यांची "*Prophets, Priests and Kings*", "*Pillars of Society*", "*The War Lords*" वगैरे पुस्तकें वाचल्यावर, आपल्याकडे आपल्या भाषांतून अशा तऱ्हेची वाङ्मयनिर्मिति होणें किती जरूर आहे याची कल्पना येते. आमच्या मतें मराठी भाषेची

व जनतेची सेवा करण्याची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या उदयोन्मुख लेखकानें कविता करीत बसण्यापेक्षां ह्याच मार्गानें प्रयत्न करावेत.

श्रीयुत गोंधळेकर यांनीं पूर्वी लिहिलेलें " **आपल्या शाळेचे पंचप्राण** हें पुस्तक वाचकांच्या परिचयाचें आहेच; त्यांच्या त्या कीर्तींत प्रस्तुत पुस्तकानें भर पडून उत्तरोत्तर त्यांचे हातून मराठी वाङ्मयाची सेवा होवो असेंच उद्‌गार आमच्याप्रमाणें वाचकहि पण काढतील अशी आम्हांस खात्री आहे.

ता. १५ आक्टोबर १९३७ **ग. स. महाजनी**

---

# अभिप्राय

## ( १ )

प्रोफेसर **प. म. लिमये,** एम्. ए. —

श्रीयुत गोंधळेकर यांनीं लिहिलेलीं अर्वाचीन महाराष्ट्रांतील थोर पुरुषांचीं आख्यायिकात्मक चरित्रें मीं समग्र वाचिलीं, व तीं वाचून फार आनंद वाटला. **थोर व्यक्तींचे चारित्र्यविशेष त्यांच्या प्रासंगिक लहान कृतींवरून किंवा उद्‌गारांवरून फार परिणामकारक रीतीनें मनावर ठसतात;** व एकदां चारित्र्याविषयीं कुतूहल वाटूं लागलें म्हणजे त्या व्यक्तीच्या जीवनकार्याकडे मन वेधतें. विद्यार्थ्यांना गोष्टींचे द्वारा इतिहासांत प्रवेश करून देण्याच्या कल्पनेचें मर्महि हेंच आहे. श्री. गोंधळेकरांनीं वर्णनभूत व्यक्तीचें स्वभाववैशिष्ठ्य स्पष्ट करणाऱ्या आख्यायिका परिश्रम घेऊन मार्मिकपणें जमविल्या आहेत. त्यांच्या वाचनानें लहान विद्यार्थ्यांच्या मनांत आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मात्यांविषयीं आदर आणि त्यांच्या कार्याविषयीं जिज्ञासा उत्पन्न होऊन शिवाय सात्विक मनोरंजनाचा उद्देशहि साधेल अशी मला खात्री वाटते.

ता. २२।१०।३७. **प. म. लिमये**

---

( २ )

**प्रोफेसर वि. ना. कुंभारे,** एम्. ए., एस्. टी. सी.,
सुपरिन्टेन्डेन्ट, न्यू, इं. स्कूल, पुणें—

रा. रा. गोंधळेकर यांच्या '**मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी**' या पुस्तकाला एक विशिष्ट महत्त्व आहे. सर्व मोठीं पुस्तकें वाचावयाला फुरसत नाहीं किंवा ऐपत नाहीं अशा लोकांना '**थोडें वाचावें पण चांगलें वाचावें**' अशी फार इच्छा असते; ती इच्छा असल्या पुस्तकानें सफल होईल. शिवाय मूळचें एकादें तरी पुस्तक विस्तरशः वाचावें अशीहि जिज्ञासा पुष्कळांना होण्याचा संभव आहे. या दोन्ही दृष्टींनीं छोट्या सारांशवजा पुस्तकांची फार गरज आहे, ती रा. गोंधळेकर यांच्या प्रयत्नानें कांहीं अंशीं भरून निघेल असा भरंवसा वाटतो.

ता. १३ ऑक्टोबर १९३७. **विष्णु नारायण कुंभारे**

---


जगांतील मुलांच्या मौजा

# (१) आशियांतील मुलें

**लेखक : शं. भा. गोंधळेकर,** एम्.ए., बी.टी.

**प्रस्तावना लेखक : प्रि. रा. वि. परुळेकर,** एम्.ए., एम्.डी.

आशिया खंडांतील बहुतेक सर्व देशांमधील मुलांमुलींच्या जीवनक्रमांतील विशिष्ट रूढी, चालिरीति समजुती इ. गोष्टींनीं युक्त व पुरवणी वाचनास योग्य असें एकमेव पुस्तक. **चित्रें ३० किं. ११ आणे.**

# आत्मनिवेदन

## आवृत्ति पहिली

**" थोर लोक म्हणजे पाजळलेले दिवे, धगधगणाऱ्या शेगड्या व उज्ज्वल सूर्य-प्रदीप होत. तेच आपणास उष्णता व स्फूर्ति देतात."** अशा थोर लोकांचा परिचय शाळांतील विद्यार्थ्यांना होण्याकरितां त्यांच्या जीवन-क्रमांतील मनोरंजक व उद्बोधक गोष्टी या पुस्तकांत दिल्या आहेत. हें पुस्तक वाचल्यावर त्यांना थोर लोकांच्या चरित्रांचा उत्कंठेनें सखोल अभ्यास करून त्यांचें अनुकरण करण्याला प्रोत्साहन मिळेल अशी आशा आहे. हें पुस्तक लिहितांना ज्या चरित्रग्रंथांचा मीं उपयोग केला आहे त्या चरित्र-ग्रंथकारांचा मी फार ऋणी आहें.

प्रि. डॉ. ग. स. महाजनी यांनीं या पुस्तकाला वेळांत वेळ काढून प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों...

ता. १५ ऑक्टोबर १९३७ — लेखक

---

## आवृत्ति दुसरी

**'मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी'** या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आला त्याबद्दल समाधान वाटतें. शालेय शिक्षणांत थोर थोर व्यक्तींची ओळख होण्यास सुरुवात होत असते आणि अशा वेळीं त्या थोर व्यक्तींविषयीं अधिक माहिती मिळविण्याची जिज्ञासा उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. ही जिज्ञासा तृप्त करण्याच्या दृष्टीनें छोट्या गोष्टींच्या पुस्तकांची शालेय वाङ्मयांत जितकी भर पडेल तितकी हवीच आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

पहिल्या आवृत्तींतील दहा थोर व्यक्तींत आणखी कांहीं व्यक्तींची भर घालून या पुस्तकाचे सुटसुटीत असे दोन भाग करावे अशी कल्पना सुचली; आणि त्या कल्पनेनुसार दोन्हीं पुस्तकें एकदमच प्रकाशित करीत आहें.

या सरकारी मान्यता मिळालेल्या पुस्तकाचा अनेक शाळांतून 'पुरवणी वाचन' म्हणून उपयोग केला गेला, त्याबद्दल त्या त्या शाळांच्या चालकांचा मी फार आभारी आहें. तशीच कृपादृष्टि त्यांनीं मजवर ठेवून या दोन्हीं पुस्तकांचा स्वीकार करावा अशी विनंति आहे.

ता. ९ डिसेंबर १९४३ श. मो. [illegible]

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रस्तावना—प्रि. डॉ. ग. स. महाजनी, एम्. ए., पीएच्. डी. एम्. एल्. सी. | | २ |
| अभिप्राय | | ३—४ |
| आत्मनिवेदन | | ५ |
| पाठ | विषय | |
| १. | महर्षि डॉ. रा. गो. भांडारकर .... .... | ७ |
| २. | न्यायमूर्ति म. गो. रानडे .... .... | १६ |
| ३. | न्यायमूर्ति का. त्रिं. तेलंग .... .... | २७ |
| ४. | मालाकार वि. कृ. चिपळूणकर .... .... | ३४ |
| ५. | समाजसुधारक गो. ग. आगरकर .... .... | ४१ |
| ६. | श्रीमंत सयाजीराव गायकवाड .... .... | ५१ |



प्रकाशक : शं. भा. गोंधळेकर, ४३३ नारायण पेठ, पुणें २.
मुद्रक : गं. वि. केतकर, लोकसंग्रह प्रेस, ६२४ सदाशिव पेठ, पुणें २.

ग्रं. सं. ठाणे

# १. डॉ. महर्षि रामकृष्ण गोपाळ भांडारकर

[ त्रोटक जीवन-वृत्तांत:—इ. स. १८३७ ते १९२५. भांडारकरांचा



जन्म मालवणास एका प्रतिष्ठित व कुलीन घराण्यांत झाला. यांचे वडील गोपाळराव हे कारकुनापासून ते मामलतदाराच्या हुद्यापर्यंत चढत गेले. रामकृष्णपंतांचें प्राथमिक शिक्षण मालवण, राजापूर येथें झालें. गोपाळरावांची बदली रत्नागिरीस झाली; यामुळें त्यांच्या मुलांची इंग्रजी शिकण्याची सोय रत्नागिरीस होऊं शकली. रामकृष्णपंत अवघे दहा वर्षांचे असतांनाच इंग्रजी शिकूं लागले. तो काळ लक्षांत घेतां त्यांच्या वडिलांनीं दाखविलेलें धोरण विशेष मननीय आहे. रामकृष्णपंतांची शिकण्याची हौस वाढतच चालली आणि वडिलांनींहि त्यांना प्रोत्साहन दिलें. रत्नागिरीहून रामकृष्णपंत मुंबईस आले; व 'एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन'मधून शेवटच्या परीक्षेंत—म्हणजे हल्लींच्या मॅट्रिकमध्यें—उत्तीर्ण होऊन ते पहिले आले. नंतर ते कॉलेजांत शिकूं लागले; त्यांना अनेक शिष्यवृत्त्याहि मिळाल्या. यांचे सर्व विषय चांगले असून त्यांची नेहमीं अभ्यासु वृत्ति असे. कॉलेज-

शिक्षण संपल्यावर त्यांनीं शिक्षकाची नौकरी पत्करली. नंतर त्यांची पूना कॉलेजांत (डेक्कन कॉलेज) 'फेलो' म्हणून बदली झाली. या ५-५॥ वर्षांच्या अवधींत त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास व व्यासंग बराच वाढविला; पण मुंबई युनिव्हर्सिटीची स्थापना १८५७ मध्यें झाल्यावर जुन्या फेलोजनीं पुन्हा मॅट्रिकची परीक्षा दिली पाहिजे, असा नियम झाला. त्याला अनुसरून १८५९ मध्यें मॅट्रिक होऊन १८६२ सालीं ते बी. ए. झाले; पुढील सालांत संस्कृत ऐच्छिक विषय घेऊन ते एम्. ए. झाले. पुढें त्यांची सिंध–हैद्राबाद व नंतर रत्नागिरी येथील हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं योजना झाली. त्यानंतर एल्फिन्स्टन व डेक्कन कॉलेजांत त्यांना प्रोफेसर म्हणून नेमलें. हेच संस्कृतचे **पहिले हिंदी प्रोफेसर!** त्यांनीं वेदादि प्राचीन संस्कृत ग्रंथांचें अध्ययन व संशोधनात्मक कार्य मोठ्या जोमानें करून हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेरहि नांवलौकिक मिळवला. युरोपांत भरलेल्या प्राच्यविद्याविशारदांच्या परिषदेकरितां त्यांना निमंत्रणें येत. व्हिएन्ना (Vienna) येथें भरलेल्या परिषदेमध्यें भांडारकरांनीं 'यज्ञविधि व पंचरात्रसंप्रदाय' या विषयावरील विद्वत्तापूर्ण निबंध वाचला, व ऋग्वेदांतील कांहीं मंत्र त्यांनीं स्वरशुद्धता राखून वैदिक ब्राह्मण म्हणतात त्याप्रमाणें म्हटले. जनकराजाच्या राजधानींत भरलेल्या विद्वत्परिषदेची या परिषदेला उपमा देऊन तिचें वर्णन भांडारकरांनीं संस्कृतांत कविता रचून केलें व त्या कविता त्यांनीं त्या सभेत म्हटल्या.

१८९३ मध्यें भांडारकर हे सेवानिवृत्त झाले; व त्याच सालीं त्यांना सरकारनें मुंबई विश्वविद्यालयाचे 'व्हाइस-चॅन्सेलर' नेमून त्यांचा बहुमान केला. यापूर्वीच त्यांना ग्युटिंगेन् युनिव्हर्सिटीकडून पीएच्. डी. ही पदवी मिळालेली होती व सरकारनेंहि त्यांना १८८९ त सी. आय्. ई. हा किताब दिलेला होता. त्यांची विद्वत्ता व संशोधनकार्य यांमुळें त्यांची त्रिखंड ख्याति झाली. त्यांचे शिष्य, स्नेही व त्यांच्याबद्दल आदर बाळगणाऱ्या चहात्यांनीं त्यांचें स्मारक त्यांच्या हयातींतच करण्याचा घाट घालून १९१७ मध्यें 'भांडारकर प्राच्यसंशोधनमंदिर' पुणें येथें उभारलें. एकंदरींत पक्षातीत राहून 'महर्षि' या योग्यतेस केवळ उज्ज्वल चारित्र्यामुळें चढलेल्या डॉ. भांडारकरांचें, त्यांच्या वयाच्या ८९ व्या वर्षीं देहावसान झालें.]

१. भांडारकरांचें मूळ आडनांव 'पत्की' होय; पण कोणा एके राजाचे पदरीं भांडारकरांच्या पूर्वजांपैकीं कोणीतरी 'भांडारा'वर अधिकारी होते; यावरून 'भांडारकर' हें नांव पडलें असें समजतात.

* * *

२. भांडारकरांचें शाळेंतील व उच्च शिक्षण संपलें तरी मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना झालेली नव्हती! व ती स्थापना १८५७ मध्यें झाल्यावर पुन्हा मॅट्रिकच्या परीक्षेस त्यांना बसावें लागलें. उच्च शिक्षण झाल्यानंतरहि पुन्हा खालच्या म्हणजे मॅट्रिकला बसण्याचा योगायोग विचित्रच म्हटला पाहिजे! विश्वविद्यालयाच्या पहिल्या मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांत भांडारकर, म. गो. रानडे, इत्यादि नांवें आढळतात.

* * *

३. यांचा आवडीचा विषय गणित, पण मराठी कवितांचा अर्थ नीट समजण्याला पावलोपावलीं संस्कृतच्या ज्ञानाची जरूरी पडे; म्हणून त्यांनीं संस्कृत भाषेचें अध्ययन आरंभिलें. शिवाय परकीयांनीं ही भाषा आत्मसात् करून आमच्या वेदांचें परिशीलन व संशोधन त्यांनीं करावें ही गोष्ट हिंदु म्हणवून घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कमीपणा आणणारी आहे, हें जाणून भांडारकरांनीं संस्कृत ग्रंथांचा परिश्रमपूर्वक अभ्यास सुरू केला व आपल्या वेदादि ग्रंथांचें प्राचीनत्व मोठ्या कुशलतेनें प्रस्थापित केलें. या संशोधनकार्यामुळेंच त्यांची कीर्ति पश्चिमेकडील देशांत पसरली.

* * *

४. १८६४ मध्यें म्हणजे वयाच्या २७ व्या वर्षी भांडारकरांनीं संस्कृतचें पहिलें पुस्तक लिहिलें व दुसरें पुढें दोन वर्षांनीं लिहून प्रसिद्ध केलें. हीं दोन पुस्तकें अजूनहि—म्हणजे ६० वर्षें लोटलीं तरी—संस्कृतच्या विद्यार्थ्यांना फार उपयुक्त वाटतात.

* * *

५. डॉ. भांडारकर हे संस्कृतचे पहिले हिंदी प्रोफेसर होत! त्यांनीं विश्वविद्यालयांत परीक्षक या नात्यानें त्रेचाळीस वर्षें काम केलें. त्यांचीं न्यायबुद्धि अगदीं तीक्ष्ण असे. ते एफ्. ई. ए. ला परीक्षक असतांना त्यांचा एक मुलगा-श्रीधरपंत-संस्कृत विषयांत उत्तम असूनहि लोकापवाद टळावा म्हणून त्या परीक्षेतील बक्षीस त्यांनीं त्याच्या बरोबरीच्या विद्यार्थ्याला दिलें! पुढील खेपेस त्यांची एम्. ए. ला परीक्षक म्हणून नेमणूक झाली असतां, ती त्यांनीं नाकारिली व कळविलें कीं, 'माझा मुलगा (देवदत्तराव) एम्. ए. ला या वर्षीं बसत आहे. तरी त्या परीक्षेला मीं एक परीक्षक असावें हें मला आवडत नाहीं....' इतका मनाचा सरळपणा इतरत्र क्वचितच दिसून येतो.

* * *

६. मुख्यत: संस्कृत ग्रंथांचें अध्ययन, परिशीलन, संशोधन व त्याप्रमाणें प्राचीन—वस्तुसंशोधन या नात्यानें केलेलें महत्कार्य यांमुळें डॉ. भांडारकरांची ख्याति सर्वत्र झाली. देशी व परदेशी मासिक पुस्तकांतून त्यांचे प्रसिद्ध झालेले अनेक लेख त्यांच्या अगाध विद्वत्तेचें व विशाल बुद्धिमत्तेचें द्योतक होत.

* * *

७. फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर डॉ. गुणे हे युरोपांत हिंडत असतां डॉ. भांडारकरांविषयीं तेथील विद्वानांना किती आदर वाटत असे याचा त्यांना चांगलाच प्रत्यय येई. डॉ. भांडारकरांचीं बहुतेक मतें पाश्चात्य पंडितांना प्रमाणभूत वाटत! १९२५ मध्यें पेट्रोग्रॅड (रशिया) येथें भरणाऱ्या प्राच्यभाषा-विशारदांच्या परिषदेला हजर राहण्याबद्दल डॉ. भांडारकरांना विनंति करण्यांत आली होती. इतकेंच नव्हे, तर त्यांचा जाण्यायेण्याचा खर्च देण्यांत येईल असेंहि सुचविण्यांत आलें होतें! तात्पर्य डॉ. भांडारकरांची गणना जगविख्यात विद्वानांत केली

जाते! त्यांनीं स्व-देशाची दिगंत कीर्ति केल्यामुळें त्यांना सरस्वतीच्या मंदिरांत उच्च स्थानीं अढळपद मिळालेलें आहे.

* * *

८. व्हिएन्ना येथें भरलेल्या 'प्राच्यभाषाविशारदां'च्या परिषदेला डॉ. भांडारकर १८८६ सालीं गेले होते. तेथील परिषदेचा सर्व थाट पाहून जनकराजानें भरविलेल्या विद्वत्परिषदेची त्यांना आठवण झाली; व त्यांनीं संस्कृत काव्य करून तें म्हणूनहि दाखविलें. त्यांतील कांहीं पद्यपंक्ति—अश्वलो भवति **बुलररूपः** । याज्ञवल्क्य इव **देवररोटौ** ॥ शाकलः किल भवेत् **किलहार्नो** । यः कहोल इति सोऽत्र च **योलिः** ॥

... ... ... ...

राष्ट्राणां स्नेहभावाय विग्रहस्य शमाय च ।
कल्पतामीदृशी संसन्मनुजानां च भूतये ॥

या कविता ऐकल्यावर परिषदेला जमलेल्या विद्वान् पंडितांनीं प्राच्य-भाषाशिरोमणि डॉ. भांडारकर यांच्या विद्वत्तेबद्दल माना डोलवून धन्योद्गार काढल्यास नवल काय?

* * *

९. डॉ. भांडारकरांना इंग्लंड, फरान्स, जर्मनी, हंगेरी इत्यादि देशांतील विद्वानांकडून संशोधनाचे बाबतींत अनेक गोष्टींचा खुलासा करण्याकरितां विनंतिपर पत्रें येत. जणूं कांहीं जगांतील विद्वान् लोकांचे डॉ. भांडारकर हे एक सल्लागारच होऊन बसले! बर्लिनच्या एका विख्यात प्रोफेसरानें त्यांना एक पत्र संस्कृतांत लिहून पाठविलें, त्यांत प्रोफेसरसाहेब लिहितात—'....श्री भांडारकराचार्यं विद्यावृध्दं सर्व-शास्त्रभांडागारं प्रणम्य सविनयं विज्ञापयति।....भवतः प्रमाणं नाहम्।'

* * *

१०. डॉ. भांडारकरांची संशोधनात्मक अमोलिक कामगिरी लक्षांत घेऊन त्यांचें एक भरीव स्मारक करण्याचें त्यांच्या शिष्यवत् असणाऱ्या

सर्व मंडळींनीं ठरविलें. तें म्हणजे पुण्यास असलेलें '**भांडारकर प्राच्य संशोधनमंदिर**' होय. या वेळीं त्यांच्या वयाला ८० वर्षें पुरीं झालीं होतीं! हयातींतच प्रचंड स्मारक ज्याचें होतें असा महात्मा विरळा! डॉ. भांडारकरांनीं या संस्थेला आपला खाजगी ग्रंथसंग्रह देणगीच्या रूपानें दिल्याचें जाहीर केलें.

* * *

११. डॉ. भांडारकरांनीं राजकारणांत फारसा भाग घेतला नाहीं, हें कांहीं अंशीं खरें आहे; पण मुळींच घेतला नाहीं किंवा त्याकडे अजिबात त्यांनीं दुर्लक्ष केलें, हें म्हणणें बरोबर नाहीं. डॉ. भांडारकर राष्ट्रीय सभेला जात व जरूर त्या ठिकाणीं सरकारवरहि टीका करीत. ते वरिष्ठ कायदेकौन्सिलचे व मुंबई कायदेकौन्सिलचे एक सभासद होते. पण मुख्यतः त्यांचें कार्यक्षेत्र संस्कृत ग्रंथांचें आलोडन करून संशोधनात्मक लेख लिहिणें हें होय.

* * *

१२. डॉ. भांडारकरांविषयीं प्रत्येक हिंदवासीयाच्या मनांत आदर वसत असे. ते राजकारणांत लढाऊ वृत्तीनें भाग घेत नसल्यानें त्यांची छाप दोन्ही पक्षांच्या लोकांवर असे. एकदां महात्मा गांधी आफ्रिकेंतील कार्याला हिंदुस्थानच्या लोकांची सहानुभूति मिळावी म्हणून लो. टिळक व ना. गोखले अशा दोघा पुढाऱ्यांना भेटले. पण दोघांनीहि असा सल्ला दिला कीं, तुम्हीं एक सभा भरवून डॉ. भांडारकरांना अध्यक्ष करा म्हणजे सर्व राजकीय पक्षांचे लोक एकत्र येतील व तुमचें कार्य सुकर होईल. त्या वेळीं दोन्ही पक्षांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे डॉ. भांडारकरच होत!

* * *

१३. मद्यपाननिषेधाची चळवळ जोरांत चालू असतां पुण्याच्या रेमार्केटच्या मैदानांत प्रचंड जाहीर सभा भरणार होती. त्या सभेंत

लो. टिळक, ना. गोखले इ. लोकाग्रणी भाग घेणार होते, पण अशा सभेचे अध्यक्ष कोणीं व्हावें हा प्रश्न उपस्थित झाला. नंतर सर्वानुमतें असें ठरलें कीं डॉ. भांडारकरांची योजना दोन्ही पक्षांना मान्य आहे. तेव्हां पक्षातीत डॉ. भांडारकर हेच त्या सभेचे अध्यक्ष झाले.

* * *

१४. डॉ. भांडारकर हे १८९३ मध्यें सेवानिवृत्त झाले, वीस वर्षें नोकरी करून १९२५पर्यंत म्हणजे बत्तीस वर्षें पेन्शनीचा उपभोग घेतला! इतका काळपर्यंत आयुरारोग्य लाभण्याचें नशीब फारच थोडयांच्या वांटयाला येत असेल! पुण्यांतील दि.ब.गोडबोले हे असेच नशीबवान होते.

* * *

१५. डॉ. भांडारकरांचा गौरव प्राच्य व पाश्चात्य विश्वविद्यालयांनीं केला. १९०४ मध्यें मुंबई विश्वविद्यालयानें कोणाहि हिंदी मनुष्यास तोंपर्यंत न दिलेली एलएल. डी. ची पदवी त्यांना दिली. एडिंबरो विश्वविद्यालयानेंहि तीच पदवी डॉ. भांडारकरांना अर्पण केली. कलकत्ता विश्वविद्यालयानें पीएच. डी. ही बहुमानाची पदवी त्यांना १९०८ मध्यें देऊन त्यांच्याविषयींचा आदर व्यक्त केला. सरकारनेंहि त्यांच्या कार्याचा गौरव करून अनेक किताब बहाल केले.

* * *

१६. डॉ. भांडारकरांची रोजनिशी लिहिण्याची संवय शेवटपर्यंत टिकली. ज्या वेळीं त्यांना मुंबई कायदेकौन्सिलचे सभासद नेमलें (१९०५) त्या वेळीं त्यांचें वय ६८ वर्षांचें होतें. ही गोष्ट त्यांच्या मनाला थोडी लागली व त्यांनीं रोजनिशींत पुढील नोंद केलेली आहे.

'The honours of membership of Legislative Council have come too late in life.'

तरी देखील ते कौन्सिलच्या सभांना नियमित हजर असत.

* * *

१७. लो. टिळकांचे वडील गंगाधरपंत व डॉ. भांडारकर यांचा विशेष स्नेह होता. लो. टिळक वडिलांचे परम स्नेही म्हणून डॉ. भांडारकरांकडे आदरानें बघत, व डॉ. भांडारकर आपल्या स्नेह्याचा मुलगा म्हणून टिळकांचें कौतुक करीत. एकदां या दोघांची गांठ बंड-गार्डनवर पडली, त्या वेळीं लो. टिळकांनीं डॉक्टरांना अगदीं लवून नमस्कार करून 'मी बळवंतराव टिळक....' असें त्यांना कमी ऐकूं येत असल्यानें मोठ्यानें सांगितलें. टिळकांचा आवाज ऐकून 'अरे तूं इकडे कोणीकडे?' म्हणून प्रेमानें विचारपूस केली. दोघांमध्यें थोड्या गप्पा झाल्यावर टिळक स्वत:संबंधानें म्हणाले, 'मी इतक्यांतच थकलों, आपल्यासारखें दीर्घायुष्य आमच्या नशिबीं नाहीं.' यावर डॉक्टरसाहेब टिळकांचा गौरव करून म्हणतात, 'अरे, तुझ्यासारखा मी राजकीय उलाढालींत पडतों....आणि तुझ्या संकटपरंपरेचा शतांश जर माझ्या वांट्यास येता तर मी मागेंच आटोपलों असतों....' इतकें बोलून डॉ. भांडारकरांनीं एका खिशांतून एक मोठें घड्याळ व दुसऱ्यांतून 'मॅग्निफाइंग लेन्स' काढून किती वाजले तें स्वत: पाहिलें व 'माझी जाण्याची वेळ झाली' असें सांगून निरोप घेतला.

* * *

१८. डॉ. भांडारकरांचे वडील १८७१ मध्यें वारले. पण ते आजारी असल्याची बातमी येतांच ताबडतोब ते मुंबईहून त्यांचेकडे गेले व प्रेमाची अखेरची भेट घेतली. वडील स्वर्गवासी झाल्यावर डॉक्टर-साहेब मुंबईला परत आले व त्या वेळेपासून त्यांनीं रंगीत तांबडें पागोटें वापरण्याचें सोडून देऊन पांढरें पागोटें वापरण्यास सुरु-वात केली! पांढरें पागोटें व उपरणें हीं त्यांनीं शेवटपर्यंत सोडलीं नाहींत. डॉ. भांडारकरांची गणना सुधारकांत केली जाते, व त्यांची वागणूकहि तशीच असे. आपल्या कन्येच्या पुनर्विवाहास त्यांनीं मोठ्या

आनंदानें परवानगी दिली. तो १८९१ चा काळ विचारांत घेतला म्हणजे डॉ. भांडारकरांनीं मनोधैर्यच दाखविलें असें म्हणावें लागतें.

* * *

१९. स्त्री-शिक्षणाचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांच्या लेकी व नाती या सर्व सुविद्य आहेत. त्यांच्या सात नातीपैकीं चौघी एम्. ए. व तीन बी.ए. आहेत. या त्यांच्या स्त्री-शिक्षणाच्या कळकळीमुळेंच कर्वे यांनीं स्थापिलेल्या भारतवर्षीय महिलाविद्यापीठाचे—ते **पहिले चँसेलर** झाले होते.

* * *

२०. डॉ. भांडारकरांचा ८८ वर्षांचा जीवनक्रम ! या एवढ्या मोठ्या आयुष्यांत त्यांना अनेक कौटुंबिक दु:खें भोगावीं लागलीं. त्यांचे देखत त्यांचे दोन कर्ते-सवर्ते मुलगे दिवंगत झाले; पण त्यांनीं हीं सर्व दु:खें मानसिक धैर्य व अढळ धर्मनिष्ठा यांच्या जोरावर सहन केलीं. मनाची शांतता त्यांनीं कधींच ढळूं दिली नाहीं. त्यांचा नित्याचा व्यवसाय व सार्वजनिक कार्यें यांत शेवटपर्यंत कधींच खंड पडला नाहीं. अशा धर्मनिष्ठ व पुण्यश्लोक महापुरुषाची गणना प्राचीन महर्षींमध्यें करण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं.

* * *

२१. महर्षि डॉ. भांडारकरांनीं ८९ व्या वर्षीं आपला पार्थिव देह ऋषिपंचमीच्या दिवशीं या भूलोकीं ठेवून सप्तर्षींच्या सहवासाकरितां परलोकीं गमन केलें !

* * *

२२. डॉ. भांडारकरांच्या अस्थि त्यांच्या चिरंजीवांनीं एक मोठा स्तूप पुण्याच्या 'प्रार्थनासमाजां'त बांधवून त्यांत ठेविल्या. अस्थिकरितां स्तूप बांधल्याचें आधुनिक कालांतील हेंच **पहिलें** उदाहरण होय.

* * *

२३. अनेक संस्थांना डॉ. भांडारकरांनीं देणग्या देऊन त्या त्या संस्थांबद्दल सक्रिय सहानुभूति दर्शविली. 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' आदि करून कितीतरी संस्थांच्या अध्यक्ष—उपाध्यक्षांच्या मानाच्या जागा त्यांनीं अलंकृत केल्या होत्या !

---

## २. न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे

[त्रोटक जीवन-वृत्तान्तः—१८४२–१९०१ महादेवरावांचे जन्माच्या वेळीं वडिलांची स्थिति बेतबाताची होती, पण खाण्यापिण्याची भ्रांत कुटुंबाला कधींच पडली नाहीं. प्राथमिक शिक्षणांत त्यांच्या बुद्धीची कुशाग्रता गुरुजींच्या निदर्शनास आली नव्हती; उलट वडील माणसांना त्यांच्याविषयीं फिकीरच वाटत असे. महादेवराव हे लहानपणीं अतिशय थंड दिसत व कमालीचे मुखदुर्बल होते. एकमार्गीपणा हें त्यांच्या स्वभावातील वैशिष्टय होय. १८५९ सालीं मॅट्रिक परीक्षा पास होऊन ते १८६२ मध्यें पहिल्या वर्गांत बी. ए. झाले.



अध्ययनाच्या कालांत त्यांनीं वाचनाची जबर गोडी लावून घेऊन चौरस

ज्ञानार्जनाकडे त्यांनीं विशेष लक्ष पुरविलें. लौकिक दृष्टया शिक्षण संपतांच त्यांनीं अध्यापनाला सुरुवात केली. हें काम पांच वर्षें करून 'ओरिएंटल ट्रान्स्लेटरचें' काम त्यांनीं केलें. पुढें कांहीं काळ न्यायदान तर कांहीं काळ कॉलेजांत विद्यादान करण्यांत गेला; पण १८७१ मध्यें ॲडव्होकेटची परीक्षा उतरल्यावर त्यांची कायमची न्यायखात्यांत नेमणूक झाली. आपली नोकरी संभाळून सामाजिक सुधारणेच्या चळवळींत ते पुढाकार घेऊं लागले व त्यामुळें त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. विविध विषयांवर निबंध लिहिणें व व्याख्यानें देणें हा त्यांचा मुख्य कार्यक्रम असे. त्यांचे निबंध व व्याख्यानें हीं विस्तृत वाचनानें संपादिलेल्या ज्ञानावर उभारलेलीं असून त्यांत नवीन धर्तीची विचारसरणी असून परिपक्व विचारांमुळें तीं उद्बोधक वाटत. सार्वजनिक सभेचीं सूत्रें हातांत घेऊन महादेवरावांनीं पेशवाईच्या नाशानें थंड गोळ्याप्रमाणें बनलेल्या महाराष्ट्रांत नवचैतन्य ओतून त्याला हातपाय हालविण्यास लाविलें. सरकारी नोकरींत असूनहि सरकारच्या अन्यायी व बेजबाबदार कृत्यांवर रीतसर टीका करण्यास महादेवराव कधींच कचरले नाहींत; त्यामुळें न्यायमंदिराच्या अत्युच्च पदावर आरूढ होण्यास त्यांना विलंब लागला पण सत्याची चाड, देशहिताची खरी कळकळ, मानसन्मानाविषयीं अनासक्तता या गुणांमुळें त्यांनीं लोकांचीं मनें आकर्षून घेतलीं होतीं. सरकारनेंहि त्यांची योग्यता ओळखून शेवटीं त्यांना हायकोर्ट जज्जाची जागा देऊन त्यांचा बहुमान केला. दोनतीन वर्षांनंतर हृदयक्रियेस जडलेला विकार बळावून १९०१ च्या जानेवारींत त्यांनीं इहलोक सोडला. हिंदुस्थानच्या अर्वाचीन राजकीय इतिहासाला आपल्या चौरस ज्ञानानें व कर्तबगारीनें नवीन वळण लावून महादेवरावांनीं अज्ञानांधकारांत सांपडणाऱ्या बहुजन समाजाच्या हिताकरितां ज्ञानज्योति पाजळून लख्ख प्रकाश पाडण्याचें श्रेय घेतलें यांत संदेह नाहीं.]

१. महादेवरावांच्या बालपणीं, त्यांच्या मातुश्री एकदां बैलगाडीनें कोल्हापुरास जात असतांना पांघरुणांत गुंडाळलेले महादेवराव गाडींतून अलगत खालीं आले! गाडीवानासह सर्व मंडळी निद्रावश झालेली असल्यानें या अपघाताची चाहूल कोणासच लागली नाहीं. पण

'अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितम् ।' या न्यायानें मागून घोड्यावरून येत असलेल्या चुलत्याचा आवाज ऐकून शांतपणानें त्यांनीं त्यांस हांक मारिली, व सर्व हकीकत सांगितली. विठूकाकांनीं परमेश्वराला धन्यवाद देत मुलाला घोड्यावर बसविलें, व ते गाडीपर्यंत दौडत आले. महाराष्ट्राचें दैव थोर म्हणूनच हा अपघात टळला असें म्हणावयाला हरकत नाहीं. नाहींतर सगळाच ग्रंथ आटोपला असता.

* * *

२. दोष म्हणा अगर गुण म्हणा त्यांच्या स्वभावांत एकमार्गीपणा विशेष होता. दशमीबरोबर (ठराविक भांड्यांतील) पातळ तूप त्यांना आई वाढत असे. पण नुकतेंच ताक केलें असल्यामुळें लोणी कढविलें नव्हतें, म्हणून आईनें दशमीवर लोणी घातलें. पण लगेच नाराज होऊन पातळ तूप न मिळाल्याकारणानें छोटे महादेवराव दशमी खाईनात. आईनें त्यांची पुष्कळ समजूत घातली पण व्यर्थ. शेवटीं तुपाच्या तामलींत पाणी घालून तें कढत करून तूप म्हणून त्यांच्या दशमीवर जेव्हां आईनें घातलें तेव्हां त्यांनीं ती दशमी मुकाट्यानें खालीं मान घालून खाल्ली.

* * *

३. ल्हानग्या महादेवाला दागिने व डामडौल यांचा मनापासून तिटकारा असे. सणावारीं गोफ, कडीं, आंगठी इत्यादि दागिने घातले तर ते दृष्टिआड करण्याकडे त्याचा सारा खटाटोप असे. पण कोणी 'तूं असें कां करतोस?' विचारल्यास त्याचें नेहमीचें उत्तर ठरलेलेंच—'आपल्या घरीं रोज माधुकरी येतात, त्यांना कुठें असतात दागिने?'

* * *

४. आईला महादेवाबद्दल फार काळजी वाटे. आईला वाटे आपला मुलगा थंड व घिम्मा. त्याला धड निरोपहि सांगतां यावयाचा नाहीं. याचें पुढें व्हायचें तरी कसें? इतर मुलें शाळेंत परीक्षा पास झालीं म्हणजे

मोठ्या आनंदानें घरीं येऊन सांगतात. आमचा मुलगा ‘ पास झाले ’ असें नुसतें सांगावयाचा सुद्धां नाहीं. मग आई म्हणत असे, ‘अरे महादेवा, तूं पास झालास हें कुठें आम्हांला नाहीं सांगितलेंस? कसली हौसच नाहीं!’ तेव्हां महादेव उत्तर करी, ‘ त्यांत काय सांगावयाचें आहे? रोज शाळेंत जाऊन आम्ही अभ्यास करितों तर पास होणारच; त्यांत जास्त काय आहे?’ असें म्हणून मुकाट्यानें जावयाचा.

* * *

५. कोजागिरीच्या दिवशीं त्यांचेकडे लहान मुलांनीं सोंगट्या वगैरे खेळण्याची पद्धत असे. पण एक साल लहान मुलांपैकीं खेळायला कोणीच नव्हतें. तरी पण महादेवानें खेळण्यासाठीं सोंगट्या मागितल्या. तेव्हां त्याला असें सांगण्यांत आलें–‘दुर्गासुद्धां निजली, आणि मग तूं सोंगट्या कोणाशीं रे खेळणार?’ ‘मी आपला कोणाशींही खेळेन. तूं दे म्हणजे झालें.’ सोंगट्या मिळाल्यावर एका खांबापुढें बसून महादेवानें सोंगट्याचा डाव मांडला. आणि एक हात आपला व एक हात खांबाचा असें ठरवून त्यानें खेळण्यास आरंभ केला. शेवटीं खांबाकडून आपल्यावर बिनतोडी लावून घेतल्या. याचें नांव निश्चय व एकमार्गीपणा!

६. इंग्रजी राज्यपद्धतीवर जरूर त्या ठिकाणीं टीका करण्याची संधी त्यांनीं कधींच दवडली नाहीं. कॉलेजांत असतांना शिवाजीची राज्यपद्धति व इंग्रजी राज्यपद्धति यांचा तौलनिक विचार करितांना महादेवरावांनीं इंग्रजी राज्यपद्धतीला दूषणें दिलीं; त्या कॉलेजचे प्रिं. सर अलेक्झांडर ग्रँट यांना ती न साहून त्यांनीं त्यांची शिष्यवृत्ति कांहीं काळ बंद केली. पण त्याच साहेबांनीं महादेवरावांबद्दल डायरेक्टरांकडे शिफारस करितांना गौरवपर उल्लेख केलेला आहे. परीक्षेकरितां अफाट वाचन करून पुन्हां वाचनाची हौस पुरी होत नाहीं

म्हणून कीं काय महादेवरावांचें इतर कित्येक ग्रंथांचें वाचन सुरूच असे. त्यांनीं खाजगी रीतीनें वाचलेल्या पुस्तकांची यादी सामान्यच काय पण अतिशय हुषार विद्यार्थ्यालाहि भेडसावून टाकील यांत शंका नाहीं.

* * *

७. कोल्हापुरास न्यायाधीश म्हणून काम पाहूं लागल्यावर त्यांनी वडिलांना पुढीलप्रमाणें विनंति केलीः—
'सर्व कोल्हापूर आपलें आहे व जो तो आपल्या कामाबद्दल भीड घालील.असा प्रकार न झाला तर बरें... कोणचेंहि काम घरीं पाहावयाचें नाहीं... असा माझा नियम आहे, तो आपण चालवावा.' यावरून आपल्या अधिकाराचा दुरुपयोग होऊं नये शिवाय वडिलांचाहि मान राखला जावा म्हणून ते किती काळजी घेत याची कल्पना येईल.

* * *

८. महादेवरावांचें वय तिशीच्या आंत असतांनाच म्हणजे अगदी तरुण वयात त्यांना पुण्यांत त्या वेळीं आठशें रुपये पगार मिळे, यावरून महादेवरावांच्या कर्तृत्वाबद्दल व योग्यतेविषयीं सरकारची पूर्ण खात्री झाली असली पाहिजे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

* * *

९. विधवाविवाह अगर प्रौढ-विवाह यांचे पुरस्कर्ते महादेवराव त्यांची प्रथम पत्नी निवर्तल्यावर महादेवराव काय करतात याकडे समाजाचें लक्ष लागून राहिलें.पण पितृभक्त महादेवरावांनी केवळ पित्याच्या आग्रहास्तव एका अकरा वर्षांच्या कुमारिकेशीं लग्न लावतांच चहूंकडून त्यांचेवर गहजब झाल्यास नवल नाहीं. या बाबतींत त्यांचे मित्रहिं शत्रु बनले. पण 'धीरसो गंभीर' या न्यायानें त्यांनीं तें सर्व सहन केलें.

* * *

१०. महादेवरावांचा पोषाख अगदीं साधा असे. त्यांना मानापमानाची बाधा कधी शिवली नाहीं. एका मोळीवालीनें एकदां त्यांची

पगडी न कळत पाडली असतां तिच्यावर न रागावतां उलट पोलिसानें तिला अडकविलें असतां तिची त्यांनीं सुटका केली. दुसऱ्या प्रसंगीं एका मोळीवाल्यानें त्यांना ओझें उचलूं लागण्यास विनंति केली असतां त्याचा शब्द त्यांनीं खालीं पडूं दिला नाहीं. अशा व्यक्तीबद्दल कोणाच्या मनांत आदर उत्पन्न होणार नाहीं ?

* * *

११. त्यांना स्वत:ची स्तुति केलेली कधींहि आवडत नसे. स्तुतिपर लेख कोणी वाचूं लागला तर लगेच ते म्हणत, 'हें काव्य ऐकण्याची गरज नाहीं, प्रतिकूल टीकेचा लेख असल्यास वाचा.' प्रतिकूल टीकेंत न सुचलेला मुद्दा सांपडेल अशी त्यांची आशा असे.

* * *

१२. त्यांनीं आपली जीभ अपशब्दांनीं कधींच विटाळली नाहीं, व रागहि लोकांस दिसूं दिला नाहीं. सोलापूर स्टेशनवर त्यांचें सामान एका उद्दाम युरोपियन अधिकाऱ्यानें डब्यांतून बाहेर काढलें, पण त्या माणसाला तें सामान कोणाचें आहे हें कळल्यावर तो अधिकारी त्यांची क्षमा मागून मोकळे व्हावें या हेतूनें त्यांचेमागें गेला. पण महादेवरावांनीं त्याला संधीच दिली नाहीं. तेव्हां त्या अधिकाऱ्याच्या मनावर इष्ट तो परिणाम होऊन त्यानें विलायतेहून 'मीं आपणांपासून सौजन्याचा धडा घेतला' असें पत्र लिहिलें.

* * *

१३. कलकत्त्यांत महादेवराव आपल्या घराशेजारीं मुद्दाम पत्नीच्या देखरेखीखालीं तयार करून घेतलेल्या बागेंत पत्नीसह बसले असतां एक बंगाली वर्तमानपत्र वांटणारा मनुष्य तेथें येऊन म्हणाला. 'आपल्याला पत्र सुरू करावयाचें आहे काय ?' त्यावर त्यांच्या पत्नींनीं सांगितलें, 'बाबारे, आम्हांला बंगाली वाचतां येत नाहीं, मग उगीच पत्र कशाला घ्यावयाचें ?' पण त्या माणसानें महादेवरावांकडे

पाहून तोच प्रश्न विचारला. तेव्हां त्यांनीं सांगितलें, आज आणलेलें पत्र असूं दे; उद्यांपासून आणूं नको. पुढल्या सोमवारीं घेऊन ये, मग सुरू करूं. ” महादेवरावांनीं आठ दिवसांत बगाली पुस्तकें आणून अभ्यास करून त्यांनीं ती भाषा समजण्याइतकी संपादिली !

* * *

१४. महादेवराव नेहमीं म्हणत, ‘ अडचणीशीं लढाई दिल्याशिवाय कार्यभाग झाल्यास त्यांत पुरुषार्थ कसला ? अडचणींच्या डोक्यावर पाय देऊन जर आपलें ध्येय, कष्टाच्या जंजाळांत दम न सोडतां, सिद्धीस नेलें तरच आपली खरी शहामत व करामत.’

* * *

१५. वक्त्याच्या आंगीं जे गुण अवश्य असावे लागतात तितके महादेवरावांचें ठिकाणीं नव्हते. रेव्हरंड जॉन स्मॉल यांच्या अध्यक्षतेखालीं महादेवरावांचें व्याख्यान झालें, त्याविषयीं साहेब म्हणतात—

“ वक्त्यांपैकीं एकजण उंच, कुरूप, रुंद कपाळाच्या कड्याखालीं केवळ यदृच्छेनें चिकटलेल्या लहानशा चढेल नाकाचा हिंदु गृहस्थ बोलायला उभा राहिला. त्यानें भाषणाची सुरुवात अगदीं थंड व आळसट पद्धतीनें केली. त्यानें असे विचित्र हातवारे केले कीं, जणूं काय तो स्वतःशींच भांडत आहे....( पण नंतर ) जादूच्या प्रयोगाप्रमाणें तत्काळ सगळी स्थिति पालटली. भूतलावरून पाय सुटून आम्ही अंतराळांत वरवर जात आहोंत, असा भाषण ऐकतांना भास झाला ....( पुढें ) वक्त्याचें नांव ‘ रानडे ’ असें कळल्यावर मी दुसऱ्याच दिवशीं त्यांचे घरीं गेलों. ज्या सॉक्रेटिसाच्या शोधांत मी होतों, **तो सॉक्रेटीस रानड्यांच्या ठिकाणीं मला सांपडला** व अत्यानंद झाला.”

* * *

१६. लोकहिताविषयीं कळकळ बाळगणारे महादेवराव कसे उपाय योजीत याचा एक मासला मननीय आहे. स्थानिक स्वराज्याचा कायदा

अंमलांत येण्याचें वेळीं रा. ब. कुंटयांनीं त्याविरुद्ध पेठोपेठीं भाषणें करण्यास सुरवात केली. अर्थात् महादेवरावांना या भाषणांना खीळ घालणें जरूर वाटलें, म्हणून एका व्याख्यानाचे वेळीं महादेवराव हलकेच येऊन इतर श्रोतृगणाप्रमाणें भुईवर बसले. पण रा. ब. कुंटयांनीं त्यांना आलेले बघतांच श्रोत्यांकडे पाठ फिरवून भिंतीकडे तोंड करून जोरजोरानें भाषण चालू ठेविलें. भाषण संपल्यावर महादेवरावांनीं कुंटयांना आपल्या गाडींतून फिरायला येण्याची विनंति केली. पण ती नाकारल्यावर महादेवराव कुंटयांच्या गाडीकडे जाऊन त्यांना म्हणाले, 'तुम्हांला माझे गाडींत बसायचें नसेल तर मीच तुमच्या गाडींत येतों!' असें म्हणून ते त्यांच्या गाडींत बसलेसुद्धां. महादेवरावांनीं इतका खटाटोप कुंटयांचा मतभेद नाहींसा करण्याकरितां केला, हें उघड होय. दुसरें दिवसापासून कुंटयांनीं आपलीं व्याख्यानें बंद केलीं!

* * *

१७. सरकारच्या मनांतून महादेवरावांना हायकोर्ट जज्जाची जागा देण्याचें फार होतें, पण त्यांची सरकारवरील टीका त्यांच्या आड येत आहे, असें सरकारनें अनेकांकडून कळविलें; पण त्याचा उपयोग कांहींच झाला नाहीं. खुद्द हायकोर्टाच्या जस्टिसनीं महादेवरावांना न्या. तेलंगांमार्फत निरोप पाठविला कीं, तुमचे लेख तुमच्या बढतीच्या आड येतात. बढती हवी तर हे उपद्व्याप नकोत.' महादेवरावांनींहि पण सडेतोड निरोप पाठविला: 'मी साहेबांचा आभारी आहें. साहेबांस कळवा कीं, मी अल्पसंतुष्ट आहें....पण जें सत्य दिसतें तें माझ्या देशहितार्थ मला सांगितलेंच पाहिजे.' शेवटीं सरकारनें त्यांचीं योग्यता ओळखूनच त्यांना हायकोर्ट जज्ज नेमलें. सरकारनें टाकलेला हा विश्वास त्यांनीं कधींच अनाठायीं होऊं दिला नाहीं. एकदां तर ते सतत **नऊ तास** निकालाचा मजकूर सांगत होते असें म्हणतात.

* * *

१८. **ह्यूमसाहेब** हे कॉंग्रेसच्या उत्पादकांपैकीं एक होत, पण ते सुद्धां देशहित सतत चिंतिणाऱ्या महादेवरावांना गुरुस्थानीं मानीत. साहेबांच्या सन्मानार्थ हिराबागेंत सर्व थोर थोर मंडळींनीं जमण्याचें ठरविलें. महादेवराव अगोदरच येऊन वरच्या मजल्यावर बसले होते. थोडया वेळानें ह्यूमसाहेबहि तेथें आले, पण जमलेल्या मंडळींत महादेवराव दिसेनात. म्हणून कोणा स्वयंसेवकास 'Where is our God Mahadeo?' असें सहज विचारलें. पण स्वयंसेवकास या प्रश्नाचा उलगडा नीट न झाल्यामुळे तो साहेबांच्या तोंडाकडेच पाहूं लागला. तेव्हां साहेबांनीं त्याची मन:स्थिति ओळखून ते म्हणाले, 'आमचा देव महादेव गोविंद रानडे तुला माहीत नाहीं?'

* * *

१९. खुद्द हायकोर्टांत कायद्याच्या बाबतींत महादेवरावांचा हात धरणारा कोणीच न्यायाधीश नव्हता. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या हायकोर्टाच्या एका विद्वान् न्यायाधिशासंबंधानें लिहितांना टाइम्सकार लिहितात, 'पार्सन्स स्वत: अतिशय विद्वान्, माहितगार व अनुभवी असतांहि त्यांना कायद्यांत अडणारे प्रश्न महादेवराव सहज सोडवीत.'

* * *

२०. कुशाग्र बुद्धीचे व न्यायदानाचा कांटा स्वपक्षाकडे अन्यायानें झुकूं न देण्याबद्दल खबरदारी घेणारे महादेवराव यांचें धर्मपर व्याख्यान डॉ. मॅकिकन यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्यांत त्यांनीं हिंदुधर्म ख्रिस्तीधर्माहून श्रेष्ठ आहे असें सप्रमाण सिद्ध केलें. जीवात्मा व परमात्मा यांचा प्रत्यक्ष संयोग होऊं शकतो, जीवात्म्याला परमात्म्याशीं अपरोक्षत्वानें हितगुज करतां येतें; या गोष्टी इतर धर्मांत नसल्यामुळें त्याचें गौणत्व स्पष्ट होतें असें त्यांनीं ख्रिस्ती गुरूंना निर्भीडपणें बजावलें.

* * *

२१. दरसाल कॉंग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद भरायची असा रिवाज असे. पण पुण्यांत कांहीं सुधारणाद्वेष्ट्यांनीं ही परिषद् भरली जाऊं नये अशी नुसती खटपट केली असें नव्हे तर 'सभा भरल्यास मंडप जाळला जाईल,' अशी धमकीहि देण्यांत आली; व ही धमकी महादेवरावांसमोर उच्चारल्यास त्यांना संताप येऊन ते उसळतील, ही धमकी देणाराची इच्छा निष्फळ झाली. बायका मुलांना सभेला घेऊन जाऊं नये, या विरोधकांच्या सूचनेला महादेवरावांनीं अतिशय थंडपणें उत्तरलें, 'तुम्हांला सुधारकांच्या बायकांपोरांबद्दल भीति वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण मांडवाच्या आगींत सांपडून तुमच्या डोळ्यांत सलणारे सुधारक अंड्यापिल्लांसुद्धां जळून जाऊन ते निःसंतान झाल्यानें तुमचा फायदाच आहे.' शेवटीं अटीतटीस न पेटतां सामाजिक परिषद माधवरावांनीं वेगळ्या मंडपांत भरविण्याचें ठरविलें.

* * *

२२. डामडौलाची हौस महादेवरावांना कधींच नसे. महादेवरावांच्या अगदीं साध्या राहणीविषयीं मलबारी लिहितात, 'महादेवराव घरांत भुईवर बसून लहानशा बैठ्या मेजावर आपलें लिहिण्याचें काम करीत....नाक शिंकण्याचें व धोतरानें तोंड पुसण्याचें काम अशा वेळीं सुरूच असे....एखाद्या महत्त्वाच्या इन्साफाचें लेखन चालू असतां महादेवराव बहुधा तुकारामाचा अभंग मनाशीं गुणगुणायचे....'

* * *

२३. रानड्यांच्या मनाचा मोठेपणा व त्याचबरोबरचा प्रांजलपणा व शांतपणा हे पुढील उद्गारांवरून दिसून येतात. एकदां रानड्यांवर टिळकांनीं कडक टीका केली व या टीकेचा उल्लेख त्यांचेपाशीं त्यांच्या एका स्नेह्यानें केला. त्यावर न्यायमूर्ति रानडे म्हणतात. 'बळवंतरावांच्या मनगटांत सामर्थ्य आहे!.......सरकारशीं आम्ही कारणापेक्षांहि जास्त संबंध ठेवतों हा खरोखर आमचाच कमकुवतपणा आहे,

व याचाच त्यांना फार राग येतो. तो मनुष्य मर्द आहे....अहो, दुसरा तरी असा मर्द व निर्भीड मनुष्य आपणांत कोण आहे?'

*    *    *

२४. महादेवरावांच्या अंगीं असलेल्या गुणांचें चीज आपल्या हातून व्हावें म्हणून संस्थानिकांत जणूंकाय चढाओढच लागली होती. बडोद्याच्या श्रीमंत सयाजीरावांनीं दिवाणगिरी पत्करण्याबद्दल महादेवरावांना तीनदां विचारलें. कोल्हापूरकरांनीं त्यांना रीजंट या नात्यानें बोलावलें होतें. पण महादेवरावांनीं अधिक हुद्याचा अगर अधिक पैशाचा लोभ न बाळगतां स्वातंत्र्यावर गदा येण्याचा संभव असल्यानें अगदीं स्पष्टपणें त्यांना नकार कळविला.

*    *    *


२५. सरकारी खोडा अडकवून घेऊनसुद्धां त्यांनीं देशहितार्थ आपला देह आमरण झिजविला. सरकारच्या रोषाची झळ सहन करण्याची वेळ आली असतां मनःस्थिति शांत ठेवून नित्य व नैमित्तिक कार्यें उरकणें महादेवरावांसारख्या अलौकिक व असामान्य माणसालाच शक्य होतें. मरणोन्मुख असतांना देखील 'काम करतां करतां मरण्यांत सुख असतें,' अशा तऱ्हेचे उद्‌गार तोंडावाटें पडावेत यांतच त्यांची कार्याबद्दलची तळमळ दिसून येते.

*    *    *

२६. रानडे यांच्यावर टिळकांनीं मृत्युलेख लिहून त्यांच्याबद्दल वाटत असलेला आदर व्यक्त केला. क्वचित् प्रसंगीं टिळक हे त्यांच्यावर तुटून पडले असतील. असे प्रसंग राजकारणी पुरुषांवर मधूनमधून यावयाचेच; तरीपण रानडे यांची योग्यता ते पूर्ण जाणून होते. टिळक म्हणतात, "रानडे यांच्यासारखा पुरुष इंग्रजी राज्य झाल्यापासून महाराष्ट्रांत झाला नाहीं! व त्यांची जागा पुढेंहि भरून निघणार नाहीं!!"

# ३. न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग

[ त्रोटक जीवन-वृत्तांत–१८५० ते १८९३. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक थोर विभूति देशाभिमानानें प्रेरित होऊन थंड गोळ्याप्रमाणें बनलेल्या आपल्या देशांत नवचैतन्य निर्माण करण्यांत गुंतल्या होत्या; त्यांपैकींच न्यायमूर्ति का. त्रि. तेलंग हे एक होत. एल्फिन्स्टन हायस्कुलांत असतांना त्यांची तरतरीत बुद्धि पाहूनच 'हा मुलगा पुढें प्रसिद्धीस आल्याशिवाय राहणार नाहीं' असें भविष्य केलें होतें. विद्यार्थिदशेंत असतांना फक्त नेमलेलीं पुस्तकेंच न वाचतां इतर पुस्तकें वाचून ते आपलें ज्ञान वाढवीत. हीच



संवय पुढें त्यांच्या बुद्धीच्या विकासास व कार्यक्षमतेस कारणीभूत झाली. तेलंग वयाच्या चवदाव्या वर्षी मॅट्रिक होऊन एकोणिसाव्या वर्षी एम्. ए. झाले. पुढील दोन वर्षांत एल्एल्. बी. व अॅडव्होकेट झाल्यावर लौकिक दृष्ट्या त्यांचा विद्याभ्यास संपला. पुढें सरकारनें देऊं केलेली मोठ्या पगाराची नोकरी अनेकदां नाकारून त्यांनीं स्वतंत्र वकिलीचा धंदा सुरू केला. थोडक्या कालावधींत आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर व अंगभूत इतर गुणांमुळें त्यांनीं आपली छाप लोकांवर पाडली. सरकारनेंहि गुणग्राहकता दर्शवून तेलंगास उच्च अशी हायकोर्टाच्या न्यायाधिशाची जागा दिली. एवढ्या वयांत कोणाहि हिंदी माणसाला एवढी बहुमानाची जागा मिळाली

नव्हती, धंदा व नोकरी संभाळून वाङ्मय, सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील त्यांची भरीव कामगिरी मननीय आहे. 'राष्ट्रीय सभे'ची उभारणी करण्याला ह्यूमसाहेबांबरोबर तेलंगाचेहि प्रयत्न व सल्ला कारणीभूत होत. अशा रीतीनें अवघ्या ४३ वर्षांत त्यांनीं उज्ज्वल असें देशकार्य करून जीवितसाफल्य केलें.]

१. तेलंगांना वाचनाचा नाद इतका दांडगा होता कीं, एलिफन्स्टन कॉलेजांत 'फेलो' म्हणून असतांना त्यांनीं कॉलेजच्या लायब्रींतील सर्व पुस्तकें इतक्या वेळां चाळलीं कीं अमुक पुस्तक अमुक कपाटांत आहे हें खुद्द लायब्रेरियनपेक्षां तेलंगच बिनचूक सांगू शकत, असें एका इंग्रजी चरित्रकर्त्यानें लिहून ठेवलें आहे.

*   *   *

२. परिश्रम करण्याची तत्परता:—तेलंगांना व्याख्यान ऐकायला जाण्याची फार हौस, पण वक्त्याचे विचार नुसते ऐकूनच ते स्वस्थ बसत नसत. ते विचार आपल्याला व्यक्त करतां येतात कीं नाहींत हें पाहण्याकरितां आरंभींच्या काळांत घरीं आल्यावर सर्व व्याख्यान ते सारांशरूपानें लिहून काढीत, व खुद्द वक्त्याकडून दुरुस्त करून घेत. खरोखर ही खरी ज्ञानार्जनाची तळमळ !

३. तेलंगांचें पहिलें जाहीर भाषण वयाच्या बाविसाव्या वर्षीं झालें. तें भाषण इतकें परिणामकारक झालें कीं, 'टाईम्स'नेंसुद्धां मुक्त कंठानें त्यांचा गौरवपर उल्लेख केला. तत्कालीन कांहीं इंग्लिश लोकांनीं त्यांच्या वक्तृत्वाविषयीं पुढील उद्गार काढले आहेत:—(*a*) It may be doubted if any native orator has equalled him in lucidity and restraint...' (*b*)'...Taken all round, in manner, matter and effect his speeches may, perhaps, be compared with those of Lord Rosebery than with the public utterances of any other English speaker of the present day.'

*   *

४. कुशाग्रबुद्धि—( अ ) तेलंगांनीं, एम्. ए. च्या परीक्षेच्या वेळीं कविता करण्याचा अभ्यास म्हणून, भगवद्गीतेचें पद्यात्मक इंग्रजी भाषांतर केलें. तें इतकें उत्कृष्ठ घठलें आहे कीं, “ कितीहि काळ लोटला तरी त्याचें ‘ इंग्लिश वाङ्मय ’ या दृष्टीनें महत्त्व केव्हांहि कमी होणार नाहीं.” ( ब ) रामायण व भगवद्गीता यांवरील विद्वत्तापूर्ण निबंध लिहून तेलंगांनीं मॅक्समुल्लर, वेबर इ. साहेबांना आपले कल्पनेवर आधारलेले सिद्धान्त चुकीचे कसे आहेत हें मोठ्या आदरानें दर्शविलें आहे. हे निबंध त्यांनीं २२ व्या वर्षीं लिहिलेले असले तरी त्यांतील मुद्देसूद विवेचन व खात्री पटविणारे आधार यांमुळे त्यांची साऱ्या जगानें स्तुति केली आहे. खुद्द टिळकांनीं आपल्या गीतारहस्यांत तेलंगांच्या संस्कृतविषयक ग्रंथांचा आधार घेतला आहे. ( क ) पाश्चात्य पंडितांमध्यें आमच्या प्राचीन ग्रंथांना अर्वाचीनत्व आणण्यांत अहमहमिका चाले, पण काशीनाथपतांनीं त्यांच्या या धोरणाचा कडक व स्पष्ट शब्दांत निषेध केला आहे. मॅक्समुल्लर साहेब म्हणतात—‘ वालखिल्यसूक्त किंवा असलींच दुसरीं सूक्तें हीं प्रातिशाख्यपेक्षांहि अलीकडचीं आहेत असें प्रतिपादन करणें शक्य झालें तर मला फार बरें वाटेल....’ यावर तेलंग लिहितात: ‘ या वाक्यांत साहेबांचा प्रांजलपणा दिसून येतो खरा, पण त्या उद्गारांवरून पाश्चात्य पंडितांची मनःस्थिति कशी असते याचा पूर्ण खुलासा होतो. अशा या कारणानें त्यांचें सत्य-शोधनाचें कार्य कितपत विश्वसनीय ठरेल हा प्रश्नच आहे. तेव्हां अशा या पूर्वग्रहदूषित व शास्त्रविरुद्ध मनः-स्थितीबद्दल जितका तीव्र निषेध करावा तितका थोडा आहे!’ या कडक लिहिण्याचा परिणाम साहेबांवर होऊन त्यांनीं तेलंगांना ‘ प्राच्य-धर्म-पुस्तकमाले’तील आठवें पुष्प गुंफण्यास सांगितलें. ( ड ) तेलंगांनीं वयाच्या २० व्या वर्षी ‘ श्रीशंकराचार्य यांचें चरित्र’ हा निबंध

लिहिला, व संशोधनकार्यास लागणाऱ्या आपल्या अंगच्या तैलबुद्धीची प्रतीति आणून दिली. या त्यांच्या विद्वत्ताप्रचुर निबंधामुळें तेलंगांची कीर्ति संस्कृतज्ञ पंडित म्हणून युरोप-अमेरिकाखंडांपर्यंत पोंचून त्यांची जगमान्य पंडितांत गणना होऊं लागली.

* * *

५. 'विनयः खलु पौरुषालंकारः ।' या उक्तीचें उत्तम उदाहरण म्हणून तेलंगांचें देतां येईल. वडीलधाऱ्या मंडळींबद्दल त्यांच्या मनांत सदोदित आदर असे. त्यांचें सौजन्य, प्रेमळ व उदार स्वभाव, निगर्वी वृत्ति यांमुळें कोणाच्याहि मनांत त्यांच्याबद्दल तिरस्कार व अनादर वास करीत नसे. मोठ्या हुद्द्यावर चढले असतांनासुद्धां त्यांनीं आपल्या मातापितरांची अवज्ञा केली नाहीं. त्यांचे हे गुण पुष्कळ वेळां कसास लागले होते— (अ) धंद्यांत भरभराट होऊन तेलंगांनीं बराच पैसा कमाविला व वडिलांना न विचारतां त्यांनीं चौपाटीवर एक बंगला विकत घेतला; व कांहीं रक्कम आगाऊहि दिली होती. वडिलांना ही गोष्ट कळविल्यावर ते म्हणाले, तूं तुझीं बायको-मुलें घेऊन बंगल्यांत रहा. बाकीचीं माणसें आम्ही याच घरांत राहतों. ' हें उत्तर ऐकून काशीनाथपंतांना बरें वाटलें नाहीं व ते लागलीच म्हणाले, 'असें असेल तर मी बंगला घेत नाहीं, बयाण्याचे पैसे गेले तरी चालतील. कुटुंबांतील सर्व माणसें राहण्यास जावयाचीं नसतील तर मला तें नवीन घर नको....' तेव्हां वडिलांनीं, 'बरें तर, खरेदीपत्र कर जा. सगळीच मंडळी तिकडे जाऊं,' असें म्हटलें. (ब) घर बदलण्याचे वेळीं देव तिकडे नेण्याचा प्रश्न आला. तेव्हां 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' या प्राचीन ऋषींच्या शिकवणीला अनुसरून आई-वडिलांना समाधान वाटावें म्हणून काशीनाथपंत पीतांबर नेसून, शाल पांघरून, डोक्यास शेला गुंडाळून आपल्या घरांतले देव हातांत घेऊन

कांदेवाडींतून चौपाटीपर्यंत सुमारें मैलभर अनवाणी चालत गेले. यां कृत्यानें कोणाच्या मनांत या महान् व्यक्तीबद्दल आदर वाटणार नाहीं? (क) तेलंग हे सुधारणावादी होते, तरी सुद्धां त्यांनीं आपल्या एका मुलीचें लग्न आठव्या वर्षी केलें. याचें कारण अर्थात् घरच्या मंडळींचा आग्रह हें उघड आहे. पण त्यांच्या अंत:करणांत चाललेल्या खळ-बळीचें आविष्करण पुढील उद्गारांत दिसून येतें, "I know what I have done will pain my friends, . . . But tell them that no one feels more than I do, that I have not done the right thing. *I plead guilty* to the charge. I have *no defence.*" या उद्गारांनीं कोणाच्या अंत:करणास पाझर फुटणार नाहीं? इतक्या प्रांजलपणें आपल्यामधील दोष जाहीर रीतीनें कबूल करणारे आपणांमध्यें किती निघतील? सर नारायण चंदा-वरकर म्हणतात—'But if Telang had not the courage to do what he thought he ought to do, *he never put a gloss on* his conduct.'

* * *

६. **उच्च ध्येय**—तेलंगांची स्वतंत्र धंदा करण्याकडे विशेष प्रवृत्ति होती. तिला अनुसरून सरकारनें देऊं केलेली ३०० रु. व पुढें ५०० रु.ची जागा त्यांनीं नाकारली. सार्वजनिक कार्य करण्यास शक्य तोंवर बंधनें नकोत या विचारानें त्यांनीं पैशाचा व मानाचा मोह आवरला. पण मोठे लोक मानाच्या मागें धांवत नाहींत, मोठें पदच त्यांच्या मागें धांवत जातें. जीविताच्या सफलतेबद्दल तेलंगांचें असें मत होतें कीं, 'मनुष्यानें आपल्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायापेक्षां कोणताही उपयुक्त सार्वजनिक व्यवसाय केला नाहीं तर त्याचें जीवित व्यर्थ होय. उदरंभर-व्यवसायापेक्षां त्याच्या हातून कांहींतरी कार्य होणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे, आणि तें बजावण्याकडे त्यानें

आपला इतर वेळ घालविला पाहिजे.' खुद्द टिळकांनींहि या सत्प्रवृत्तीबद्दल प्रशंसापर उद्‌गार काढले आहेत.

* * *

७. **तेलंगपंथ**—'आधीं राजकीय सुधारणा कीं सामाजिक' या बुद्धिभ्रंशानें तेलंग पछाडले नव्हते. त्यांचें असें मत होतें कीं, देशाची सर्व बाजूंनीं राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक प्रगति झाली पाहिजे. अमुक कामें आधीं हातीं घेऊन बाकीचीं मागाहून पाहूं असें म्हणणें युक्त नाहीं. ही जी सर्व बाजूंनीं सुधारणा करण्याचे प्रयत्न करणारी मंडळी हिलाच न्या. रानडे यांनीं 'तेलंगपंथ' हें नांव दिलें.

८. **मानसन्मान**—(अ) १८८४ च्या जून महिन्यांत तेलंगांनीं सरकारनियुक्त शिक्षण-समितीवर असतांना उत्कृष्ट कामगिरी केली म्हणून त्यांना सी. आय. ई. हा किताब मिळाला. केसरीनें सुद्धां त्यांच्या कामगिरीचा गौरवपर उल्लेख करून त्यांना मिळालेल्या मानाबद्दल त्यांचें अभिनंदन केलें. (ब) न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनीं नामदार तेलंग यांना शाळेंत पानसुपारीस बोलावून त्यांना मानपत्र दिलें. पुढें डे. ए. सोसायटी स्थापन झाल्यावर तेलंग हे एक हजार रुपये भरून त्या सोसायटीचे 'पेट्रन' झाले. प्रसंगानुरूप त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल, पुणें, या नमुनेदार संस्थेविषयीं अभिमानाचे उद्‌गार काढले आहेत. यासंबंधीं आठवण अशी सांगतात कीं, दणदणीत हायस्कूल व त्यांतील ते तरतरीत शिक्षक पाहून त्यांना मोठें कौतुक वाटलें व त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं, 'हायकोर्टांत वकिली करण्यापेक्षां या शाळेंत शिक्षक म्हणून राहिलों तर मला कितीतरी आनंद होईल.' (क) तेलंग हे अविश्रांत कार्य करीत असल्यानें त्यांना विश्रांतीची खरोखर जरूरी होती, व ती मिळावी म्हणून शेवटीं त्यांनीं हायकोर्टाच्या जज्जाची जागा पत्करिली (१८८९). त्यांच्या या कृत्यानें राष्ट्रीय सभेचा एक आधारस्तंभ कमजोर होणार अशी कित्येकांना भीति वाटली. पण

खुद केसरीनें लिहिलें कीं, 'आम्हांला वाटतें, नामदारसाहेबांना जें आता उच्च पद मिळालें आहे त्यापासून तर आम्हांस अधिक उपयोग झाला पाहिजे. ही नोकरी पत्करून काशीनाथपंतांनीं आपलें स्वातंत्र्य गमावलें असें नसून, त्यांना तें सन्माननीय पदाच्या योगानें विशेष जोरदार रीतीनें दाखवितां येईल, आणि ते दाखवतील अशी आशा आहे.' 'न्यायाधिशाच्या कामाचा ते एक वेळ कित्ता बनून राहिले होते.' असें इंदुप्रकाशानें म्हटलें आहे. (ड) १८९२ मध्यें तेलंगांची व्हाइस-चॅन्सेलरच्या जागेवर नेमणूक झाली. मोठ्या जबाबदारीच्या जागेवर लायक माणसांची नेमणूक होणेंच उचित आहे. पण सरकारच्या व जनतेच्या दृष्टीनें एकच व्यक्ति लायक ठरणें हें क्वचितच घडतें. पण ही गोष्ट तेलंगांच्या नेमणुकीनें घडली, केसरीकार म्हणतात—'आमच्या इलाख्यांत नेटिव्हांस हा मान मिळाल्याचा **पहिलाच** प्रसंग असल्यामुळें व काशीनाथपंतांसारख्यांची योग्य निवड झाल्याचें हें वर्तमान ऐकून सर्वांस आनंद होईल यांत संदेह नाहीं.'

९. **उदार धोरण**—गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतींत तेलंग भरपूर मदत करीत, पण त्यांच्यासंबंधीं त्यांनीं एज्युकेशन कमिशनच्या रिपोर्टांत पुढील वाक्य लिहिलें आहे—'The poor boys are the very salt of our Schools and Colleges.' तेव्हां 'सरकारनें फी-माफीचे बाबतींत उदार धोरण स्वीकारलें पाहिजे' असें असंदिग्ध शब्दांत लिहून ठेविलें आहे.

* * *

१०. नामदार न्यायमूर्ति तेलंग हे ता. १ सप्टेंबर सन १८९३ रोजीं इहलोक सोडून गेले. त्यांच्या प्रेतयात्रेस सर्व जातीचे लोक होते. त्या वेळीं झालेल्या भाषणांत एका मोठ्या मुसलमान गृहस्थानें पुढील उद्गार काढल्याचें चंदावरकर सांगतात—'Mr. Telang was a Hindu, an Englishman, a Parsi, a Mahomedan, all

rolled into one'. तेलंगांच्या स्मारकासंबंधानें भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान खुद्द गव्हर्नरसाहेबांनीं मंडित केलें होतें.

स्मारकें—(१) एलिफन्स्टन कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरितां तेलंगांच्या स्मरणार्थ वसतिगृह. (Telang Wing). (२) गोध्रा येथील 'तेलंग हायस्कूल'). (३) एम्. ए. च्या परीक्षेंत इतिहास व तत्त्वज्ञान या विषयांत पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यास 'तेलंग सुवर्ण-पदक.' हें पदक काशीनाथपंतांच्या ज्येष्ठ चिरंजिवांनी मिळविलें होतें.

---

## ४. मालाकार विष्णु कृष्ण चिपळूणकर

[ **त्रोटक जीवन-वृत्तांत**–१८५० ते १८८२. विष्णुशास्त्री यांचे वडील



कृष्णशास्त्री हे सरकारी नौकरींत राहून सरकारांत व लोकांत मानमान्यता पावलेले होते. विष्णुशास्त्र्यांना घरच्या सुस्थितीमुळें अभ्यासक्रम निर्वेध शेवट-पर्यंत नेतां आला. शाळेंतील त्यांची वागणूक नियमित व अभ्यासू अशी होती. त्यांचा अबोल स्वभाव घरींदारीं सारखाच दिसून येत असे. १८६६ मध्यें मॅट्रिक झाल्यानंतर शास्त्रीबुवा पूना कॉलेजांत उच्च शिक्षणाकरितां प्रविष्ट झाले. एकंदर अनुकूल परि-स्थितीमुळें त्यांना वाचनाची अत्यंत गोडी लागली. इतिहासावरील ग्रंथ, संस्कृत काव्यें, मोरोपंतांच्या कविता यांचें वाचन अखंडित चालूं असे. तेव्हां अशा रीतीनें पुढील उज्ज्वल कार्याची

तयारी त्यांनीं चांगल्या तऱ्हेनें करून ठेविली होती. मित्र-मंडळींत सदा वावरूनहि ते मितभाषी राहिले. लोक काय बोलतात तें मात्र मन लावून ऐकून घेत, त्यामुळें त्यांना इंग्लिश लेखक अॅडिसनची उपमा दिली जात असे. बी. ए. झाल्यानंतर वकिलीचा अभ्यास न करितां सर्व काळ अॅडिसन, जॉन्सन यांच्याप्रमाणें वाचनांत व लिहिण्यांत घालवावा असें त्यांनीं ठरविलें. प्रपंचाची काळजी नसल्यानें त्यांचें हें मनोगत पूर्ण होणें कठिण नव्हतें. शिवाय वडिलांनींहि त्यांना तसें करण्यास प्रोत्साहनच दिलें. 'रासेलस'च्या कांहीं भागांचें भाषांतर वडिलांच्या सांगण्यावरून शास्त्रीबुवांनीं शाला-पत्रकांत प्रसिद्ध केलें. पुढें ज्या कृतींनीं विष्णुशास्त्री कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदावर अधिष्ठित झाले त्यांपैकीं एक म्हणजे **निबंधमाला** होय. ही **निबंधमाला** सरस्वतीदेवीच्या कंठांतील अत्यंत मौल्यवान् दागिना होय. शास्त्रीबुवांनीं एक विशिष्ट भाषासरणी सुरू करून मराठी गद्याला एक वेगळेंच वळण लावलें. इंग्रजी विद्येच्या लख्ख प्रकाशानें ज्यांचे डोळे दिपले व ज्यांना स्वत्वाची ओळख पटेनाशी झाली त्यांच्यावर कोरडे ओढण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. नोकरीची अडकवून घेतलेली रुपेरी शृंखला तोडून त्यांनीं स्वतंत्र उद्योग आरंभिले. **न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा, किताबखाना** इ. त्यांचे स्वतंत्र उद्योग होत. मनांत योजलेलीं कार्ये तडीस गेल्याबद्दल त्यांना अपरिमित समाधान वाटलें असेल यांत शंका नाहीं; पण असा कार्यकर्ता महाराष्ट्राच्या दुर्दैवामुळें निघृण काळाकडून लवकरच नेण्यांत आला. त्यामुळें महाराष्ट्राला ते फार काळ लाभले नाहींत. १७ मार्च १८८२ रोजीं **न्यू इंग्लिश स्कूलचा संस्थापक** व **मराठी भाषेचा शिवाजी** महाराष्ट्रास पोरके करून इहलोक सोडून गेला. ]

---

१. विष्णुशास्त्र्यांचे वडील कृष्णशास्त्री यांचें मुलाच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष नसें, तरीपण विष्णुशास्त्र्यांच्या अभ्यासाबद्दल त्यांना विशेष खात्री व उमेद असे. शास्त्रीबुवाहि आपला अभ्यास मन लावून करीत व समवयस्क बंधूंना कांहीं अडचणीच्या गोष्टी समजावून सांगत. या छोटया मंडळींचें नेतृत्व विष्णुशास्त्र्यांकडेच ओघाओघानें आलें.

* * *

२. विष्णुशास्त्री हे दिसायला अतिशय थंड असत; पण त्यांचे बंधु सितारामपंत चुणचुणीत व तल्लख बुद्धीचे भासत. एकदां हे दोघे सूक्ष्मदर्शक यंत्रानें रक्तबिंदूंतील द्रव्यांच्या पृथक्करणाचा प्रयोग पहाण्याकरितां गेले होते, तेथें प्रो. केरोपंत छत्रे हेहि आले होते. सितारामपंतांची बाह्यात्कारी हुषारी पाहून तेथील डॉक्टर म्हणाले, 'पहा, हा विष्णु किती थंड आहे! सिताराम बरा हुषार दिसतो, त्यानें इकडून तिकडून सर्व यंत्र पाहिलें; पण विष्णु हा एके जागेवरून हाललां देखील नाहीं.' पण चाणाक्ष केरोपंतांनीं उत्तर दिलें, 'विष्णू हा दिसण्यांत चंचल नाहीं खरा, पण त्यानें एके जागेवरच उभें राहून या प्रयोगांतील जितक्या खुब्या लक्षांत आणल्या असतील तितक्या चोहोंकडून फिरून पाहूनहि सितारामाच्या लक्षांत आल्या नसतील!'

* * *

३. शास्त्रीबुवांना अभ्यासाव्यतिरिक्त इतर वाचनाचा इतका नाद होता कीं त्यांचें लक्ष त्यामुळें अभ्यासाकडे कमी होई; पण परीक्षेंतील यशापयशाकडे त्यांचें विशेष लक्ष नव्हतें. या विस्तृत वाचनाचा फायदा निबंधलेखनाच्या कामीं त्यांना झाला यांत शंका नाहीं.

* * *

४. विष्णुशास्त्री यांच्या वाचनव्यवसायांतील एक वैशिष्ट्य म्हणजे ते जुने ऐतिहासिक ग्रंथ अभ्यासपूर्वक वाचीत, खोंचा व मर्मस्थानें अचुक हुडकून काढून त्यांवर टीकात्मक लेख लिहीत, पण आधुनिक इतिहासाचीं साधनें जीं वर्तमानपत्रें तीं ते सहसा वाचीत नसत. एवढा मोठा चिकित्सक निबंधकार पण त्याची वर्तमानपत्रांविषयीं अशी अनास्था याचें मोठें आश्चर्य वाटतें! लोकांकडून मिळालेल्या किंवा सहज कानीं आलेल्या वर्तमानसारावरच ते गुजराणा करीत.

* * *

५. विष्णुशास्त्री यांचा स्वभाव अगदीं साधा व निरहंकारी असे. ते आपण होऊन कोणासहि शब्दानें अगर कृतीनें दुखवीत नसत. त्यांच्या स्वभावांतील विशेष गोष्ट म्हणजे ते नेहमीं अबोल असत. या त्यांच्या मितभाषणी स्वभावामुळें त्यांस लोक प्रख्यात आंग्ल लेखक ॲडिसनची उपमा देत. याचा अर्थ ते एकांतप्रिय किंवा एकलकोंडे होते असा नाहीं. ते चारचौघांत उठत बसत, खेळ-गाणें इत्यादि कार्यक्रमास ते हटकून अभ्यास टाळूनहि हजर राहत. पण त्यांची भूमिका फक्त श्रोत्याची अगर प्रेक्षकाची ! अभ्यासाच्या बाबतींत त्यांचा एक नियम असे. कॉले-जांतून गांवांत घरीं आल्यावर प्रत्येक रविवारीं पांच ओळींचें संस्कृत भाषांतर करावयाचें हा त्यांचा नियम अखंड तीन वर्षेंपर्यंत चालला ! याचा त्यांना पुढें बराच फायदा झाला असें ते म्हणत. सामान्य विद्या-र्थ्यांनें या गोष्टीपासून जरूर बोध घ्यावा.

* * *

६. डेक्कन कॉलेजांत संमेलनप्रसंगीं नाटक होत असे. शास्त्रीबुवाहि त्या नाटकांत उत्साहानें भाग घेत. एकदां वेणीसंहार नाटकांत शास्त्री-बुवांनीं धर्मराजाची भूमिका घेतली होती. शेवटीं धर्मराजा अग्निप्रवेश करण्याची तयारी करून पितृतर्पण करीत आहे अशा प्रवेशाच्या वेळीं प्रेक्षकांत बसलेल्या कृष्णशास्त्र्यांकडे—विष्णुशास्त्र्यांचे वडील—लोक टकामकां पाहूं लागले, त्यामुळें बरीच गम्मत उडाली.

* * *

७. शिक्षकाचा व्यवसाय चिपळूणकरांना मनापासून आवडे. त्यांचें विस्तृत वाचन, अगाध ज्ञान, शिकविण्याची कळकळ इत्यादि उत्तम शिक्षकाचे आंगीं असणारे गुण त्यांचे ठिकाणींहि होते. पण वर्गांत वेळेवर जाणें, मुलांकडून अभ्यास वगैरे करवून घेणें, शिस्त राखणें या गोष्टींकडे त्यांचा अगदीं कानाडोळा असे. वाचनांत गुंग झाल्यावर वर्गावर जाण्यास हटकून पंधरा-वीस मिनिटें उशीर व्हावयाचाच !

* * *

८. बी. ए. झाल्यावर पुढला सरळ मार्ग म्हणजे एलएल. बी., अशी त्या वेळची परस्थिति होती; पण शास्त्रीबुवांना वकिलीच्या धंद्याचा तिटकारा असे. त्यामुळे शास्त्रीबुवा त्या बाजूला वळलेसुद्धां नाहींत.

* * *

९. १८७४ मध्यें म्हणजे वयाच्या चोविसाव्या वर्षापासून सुरू केलेल्या **निबंधमालेमुळें** चोहोंकडे त्यांची कीर्तिप्रभा फांकली. खुद्द चिपळूणकरांना स्वभाषेचें दैन्य आपल्या उज्ज्वल लेखणीनें संपुष्टांत आणतां आलें, याबद्दल अभिमान वाटे; एकदां आनंदाच्या भरांत आपल्या हातून झालेल्या भरीव व स्फूर्तिदायक कामगिरीकडे सिंहावलोकन करून स्वत:ला थोडेंसें धन्य मानून त्यांनीं पुढील उद्गार काढले, ‘ I am the Shivaji of the Marathi language, who had not his equal either to precede or succeed him ! ’

* * *

१० धर्माचे बाबतींत त्यांचे तोंडीं पुढील वचन नेहमीं असे:‘ धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां। महाजनो येन गत: स पंथा: । ’ ईश्वराचें अस्तित्व, देव एक आहे का अनेक आहेत या प्रश्नाबाबत त्यांच्या मनांत कधींच निर्णय झालेला नव्हता.

* * *

११. मराठी भाषेचे शिवाजी, आपल्या मायबोलीला उच्च दर्जा प्राप्त करून देणारे मालाकार आपलीं खाजगी पत्रें इंग्रजींत लिहीत, याचें मोठें आश्चर्य विद्वान् लोकांनाहि वाटत आहे!

* * *

१२. चांगल्या पगाराची सरकारी नौकरी ही रुपेरी शृंखला मानून ती तोडून टाकण्याचें धैर्य शास्त्रीबुवांनीं दाखविलें. त्यांचें मन वळविण्याकरितां अनेकांचीं पत्रें आलीं;पण शास्त्रीबुवांचा विचार फार दिवसांचा असल्यामुळें कोणाचाहि प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. एका पत्रांत ते म्हणतात, ‘ It is then my supreme disgust of

the drudgery of a government school-life that led me to resign my place. ' स्वाभिमानाची होळी पेटवून पारतंत्र्यांत पिचत पडणाऱ्यांनीं शास्त्रीबुवांची ही कृति दृष्टीआड करूं नये.

* * *

१३. तरुण पिढीला राष्ट्रकार्यप्रवण करण्याला सरकारी शिक्षण निरुपयोगी आहे, याची खात्री झाल्यानें खाजगी शाळा काढण्याचा बेत शास्त्रीबुवांनीं केला. या कार्याला हातभार लावण्यासाठीं बा. गं. टिळक, आगरकर, नामजोशी इत्यादि तडफदार लोक येऊन मिळाले व ता. १ जानेवारी १८८० रोजीं **न्यू इंग्लिश स्कूल** ही शाळा उघडली.

* * *

१४. पुणें शहरांतील सुप्रसिद्ध किताबखाना व चित्रशाळा या दोन्ही संस्था चिपळूणकरांच्या प्रोत्साहनामुळें अस्तित्वांत आल्या.

* * *

१५. शास्त्रीबोवांचा अबोल स्वभाव त्यांच्या संभाषणपद्धतींतहि दिसून येत असे. त्यांच्याशीं बोलणारा विशेष सलगीचा नसला तर शास्त्रीबोवांच्या तोंडांतून फक्त एखादा दुसराच शब्द बाहेर पडावयाचा. आपण होऊन सहसा ते गप्पा मारण्यांत गढून जावयाचे नाहींत. पण इतर काय बोलतात याकडे मात्र त्यांचें बारकाईनें लक्ष असावयाचें!

* * *

१६. वाचन हा त्यांचा दांडगा व्यवसाय; रात्रीं अंथरुणावर पालथे पडून १२।१ वाजेपर्यंत ते वाचीत पडत. लिहिण्यावाचण्याला अमुकच वेळ असें त्यांचें ठरलेलें नसे.

* * *

१७. शास्त्रीबुवांनीं रोजनिशी लिहिण्याची संवय शेवटच्या ८।१० वर्षांत लावून घेतली होती. पण त्यांची लिहिण्याची तऱ्हा अशी कीं, त्यांतील मजकूर लिहिणाऱ्याखेरीज इतरांना कळूंच नये. हीं खाजगी

टिपणें कधीं इंग्रजींत तर कधीं अर्धवट मराठींत लिहिलेलीं आढळतात. रोजनिशींतील मजकूर फक्त लेखकाकरितांच आहे अशी त्यांची समजूत दिसते.

* * *

१८. ज्या कृतीमुळें शास्त्रीबुवा कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदावर अढळ झाले ती कृति **निबंधमाला** होय. या कृतीला वयाच्या चोविसाव्या वर्षापासून प्रारंभ झाला; व एकंदर ८४ अंक बाहेर पडले. वाङ्मयांतील 'निबंध' हा प्रकार शास्त्रीबुवांनींच विशेष रूढ केला. त्यांच्या निबंधमालेंतील कांहीं निबंध सरकारी धोरणावर कडक टीकात्मक असे होते. त्यामुळें त्यांच्यावर सरकारचा रोष झाला असतां त्याची त्यांनीं फिकीर कधींच बाळगली नाहीं.

* * *

१९. वक्तृत्वकलेचा अभाव ही एक मोठी उणीव शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं दिसून येते. त्यांनीं जाहीर व्याख्यानें दिल्याचें कोठेंच नमूद नाहीं, ते जातील तेथें सर्व गोष्टींचें मार्मिक अवलोकन करीत राहतील. पाल्हाळानें संभाषण करण्याचें त्यांना ठाऊक नव्हतें.

* * *

२०. शास्त्रीबुवांना थोर थोर लोकांच्या आख्यायिका ऐकण्याचा विशेष नाद असे. त्यांनीं चटकदार व गमतीदार गोष्टींचा मोठा संग्रह करून ठेविला होता. तोच 'विनोद व महदाख्यायिका' या नांवानें प्रसिद्ध आहे.

* * *

२१. शास्त्रीबुवांच्या अकालीं मृत्यूची बातमी चोहोंकडे पसरली व स्मशानयात्राहि मोठी निघाली. शेवटीं ओंकारेश्वरावर प्रेतास अग्नि देण्यापूर्वी त्यांच्या एका शिष्यानें गुणवर्णनपर असें थोडक्यांत भाषण केलें. तें झाल्यावर आणखीहि कांहीं सद्गृहस्थांचा भाषण करण्याचा

विचार होता, पण केरोपंतांनीं धूर्तता राखून सांगितलें, 'तुम्ही उगाच अधिक भाषणांत वेळ घालवाल आणि मध्यंतरी पोलिसांनीं पुन्हा कटकट उपस्थित केली म्हणजे पस्तावाल!' लागलीच दहनविधि उरकण्यांत आला. अशी एक कंडी त्या वेळीं उठविण्यांत आली होती कीं, कोल्हापूर प्रकरणीं चिपळूणकर अगदीं निरुत्साही बनले होते व स्वतःवर त्यांनीं विषप्रयोग करून घेतला असावा. कांहींहि असलें तरी केरोपंतांची सूचना व्यावहारिक स्वरूपाची असल्यानें ती तावडतोब अंमलांत आणली गेली.

* * *

२२. अवघ्या बत्तीस वर्षांच्या अल्प आयुर्मर्यादेंत एवढा पसारा पसरविणाऱ्या व्यक्तीच्या अकालीं मृत्यूची दुःखद वार्ता ऐकून रा. ब. रानडे यांनीं, डोळयांतून अश्रुप्रवाह चालला असतांना 'He bad no business to die so soon' असे मोठ्या कळवळयाचे उद्‌गार काढले ते सार्थच होत. लंडनमधील 'ग्रॅफिक' पत्रानेंसुद्धां शास्त्रीबुवांच्या कामगिरीचें यथार्थ वर्णन केलें होतें.

---

# ५. समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर

[ त्रोटक जीवन-वृत्तांत :-- १८५६ ते १८९५. गोपाळरावांना घरच्या बिकट परिस्थितीमुळें शिक्षणक्रमाच्या सुरुवातीपासून ते अखेरपर्यंत शिक्षणसंपादनाच्या कामी पुष्कळ हालअपेष्टा सोसाव्या लागल्या पण ध्येयपूर्तीसाठीं त्यांनीं त्या सर्व अत्यंत चिकाटीनें सहन केल्या. गोपाळरावांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण मामांच्या आश्रयामुळें पार पडलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मॅट्रिक झाल्यानंतर गोपाळराव पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत उच्चशिक्षणाकरितां प्रविष्ट झाले. शिष्यवृत्त्या, बक्षिसें व अध्यापकवर्गाची

सहानुभूति यांच्या जोरावर त्यांचें उच्च शिक्षण पार पडलें. कॉलेजांत फेलो झाल्यावर एम्.ए. करितां त्यांनीं इतिहास, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान ह्या ऐच्छिक



विषयांचा अभ्यास केला. त्यामुळें हर्बर्ट स्पेन्सर, जॉन स्टुअर्ट मिल्ल इ. पाश्चिमात्य तत्त्वज्ञांचा परिचय होण्याची त्यांना संधि मिळाली. लेखनव्यवसाय व वादविवाद यांना आवश्यक लागणारी तर्कशुद्ध विचारसरणी गोपाळरावांनीं या वेळीं संपादून ठेविली होती. गोपाळराव कॉलेजांत फेलो असतांना त्यांची टिळकांशीं मैत्री जमली. या तरुण बाळ-गोपाळांच्या मनांत त्या वेळीं नोकरीची शृंखला कायमची अडकवून घेण्यापेक्षां स्वतंत्र बाण्यानें देशसेवा करावी असे विचार वारंवार येत. याच विचाराला अनुसरून शिक्षण संपल्यावर ते चिपळूणकरांनीं नवीन काढलेल्या शाळेला कायमचे येऊन मिळाले. आरंभीं 'केसरी'ची सर्व जबाबदारी गोपाळरावांचे वर असे. अल्पावधीतच **केसरी** लोकप्रिय होऊन लोकादरास पात्र करण्याचें श्रेय गोपाळरावांकडेच येतें. भावी पिढी नादान, स्वाभिमानशून्य, अधश्रद्धेला बळी पडणारी निघूं नये म्हणून समाजहित व त्याचबरोबर राष्ट्रसेवा करण्याचें कंकण बांधण्याचा त्यांनीं निग्रह कायम केला. घरांतून निघून गेलेल्या लक्ष्मीला खेंचून आणण्याचें सामर्थ्य गोपाळरावांत होतें, पण मनाचा खंबीरपणा त्यांनीं कोठल्याच खडकावर फुटूं दिला नाहीं. सार्वजनिक कार्यास आरंभ करतांच कोल्हापूर प्रकरण उद्भवून त्यांना एकशें एक दिवस डोंगरीच्या तुरुंगांत कढावे लागले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन होऊन जेव्हां फर्ग्युसन कॉलेज निघाले तेव्हां गोपाळराव कॉलेजांत शिकवूं लागले. पुढें प्रि. वामनराव आपटे वारल्यावर आगरकर कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले.

मध्यतरी टिळक व आगरकर यांच्यांत मतभेद उत्पन्न होऊन आगरकरांना **केसरी**चा संबंध सोडावा लागला. पण समाजसुधारणेचा गाडा सुरळीत चालण्याला आवश्यक म्हणून **सुधारक** पत्र त्यांनीं सुरू केलें. आगर-

करांनीं लोकांच्या बुद्धीस चालना देऊन त्यांना स्वतंत्रपणें विचार करावयास लावलें. निःस्पृहपणा, सत्यप्रीति, लोकसेवेची तळमळ, कार्याविषयीची तत्परता इत्यादि गुणांमुळें त्यांचे प्रतिस्पर्धीसुद्धां त्यांना जरा वचकून असत. असा कार्यकर्ता वयाच्या अवघ्या ३९ व्या वर्षीं मरणाधीन व्हावा हें खरोखर देशाचें दुर्दैव होय.

---

१. पहिल्या तीन इयत्ता कऱ्हाडास मामाचे आश्रयाखालीं पार पडल्यावर पुढील शिक्षणाकरितां गोपाळरावांनीं रत्नागिरीस जाण्याचें ठरविलें. पण रत्नागिरी पडली १५० मैल दूर! पैशाची सर्व बाजूंनीं कुचंबणा! विद्यार्जनाची तर तीव्र तळमळ, तेव्हां गोपाळरावांनीं मनाचा हिय्या करून हा प्रवास पायीं केला असें म्हणतात. रत्नागिरीस गेल्यावर तेथेहि त्यांना वार लावून व हलकीसलकीं कामें करून पोटाचा प्रश्न सोडवावा लागला.

* * *

२. प्रवेशपरीक्षा पास झाल्यावर गोपाळरावांनीं कॉलेजचा नाद सोडावा असा आप्तेष्टांनीं सल्ला दिला; पण 'डिग्री घेतल्यावांचून राहणार नाहीं' असा त्यांचा निग्रहच असल्यामुळें ते डेक्कन कॉलेजांत प्रविष्ट झाले. या ठिकाणीं गोपाळरावांना अनेक वेळां एकच सदऱ्यानिशीं राहावें लागे. सदरा पहाटे धुवावा व तोच दुपारीं वाळवून अंगांत घालावा असा क्रम चाले. या घोर तपश्चर्येंतच यशाचें बीज आहे.

* * *

३. गोपाळरावांजवळ 'फर्स्ट इयर'च्या परीक्षेची फी भरण्याला पैसे नव्हते. म्हणून एखादें नाटक लिहून पैसे जुळवावे असें त्यांनीं ठरवून तसें करण्यास सुरुवात केली. पण ही गोष्ट त्या वेळचे प्रो. केरोपंत छत्रे यांच्या कानावर गेली, व त्यांनी गोपाळरावांना फीचे पैसे देऊन या दगदगींतून मोकळें केलें. अशा रीतीनें गोपाळरावांना अभ्यास करण्यास पुष्कळ सवड मिळूं शकली.

४. बी. ए. ची परीक्षा झाल्यावर हात धुऊन पाठीमागें लागलेलें दारिद्र्य नष्ट होणें कांहीं कठीण नव्हतें. पण जाज्वल्य स्वाभिमानाची ज्योत अंतःकरणांत पेटलेली असल्यामुळें गुलामगिरीच्या शृंखला अडकवून न घेण्याचें त्यांनीं ठरविलें. 'अज्ञान हा सर्व अधोगतीचा पाया आहे,' अशी त्यांची खात्री झाली असल्यानें त्यांनीं अज्ञ जनांना शहाणे करून सोडण्याचें कंकण बांधलें होतें यांत आश्चर्य नाहीं.

* * *

५. १८७९ सालीं एम्. ए. चा अभ्यास करीत असतांना टिळकांशीं विशेष सलगी होऊन आगरकर व टिळक हे दोघेहि अत्यंत जिगर दोस्त बनले. पुढील आयुष्यांतील उज्वल कार्याची रूपरेखा त्यांनीं याच वेळीं ठरविली.

* * *

६. गोपाळरावांना शाळेंत जाण्यास एकदां उशीर झाला असतां त्यांचे शिक्षक महाजनी जरा चेष्टेनें त्यांना म्हणाले, 'तुमचा काय अभ्यास होणार हें दिसतेंच आहे; तुम्ही असेच रखडत पडणार.' हा वाग्बाण न साहून गोपाळराव तत्काल उद्गारले, 'मी आपल्या-सारखा एम्. ए. झालों तरच नांवाचा आगरकर! हे आत्मविश्वासाचे बोल खरे ठरण्याची वेळ आली हें पाहून गोपाळरावांना अंतर्यामीं किती धन्यता वाटली असेल!

* * *

७. प्रिं. सेल्बीसाहेब यांची आगरकरांवर विशेष मर्जी असे. साहेबांचा जो आवडता विषय तत्त्वज्ञान तोच सुदैवानें आगरकरांचा, यामुळें सेल्बीसाहेबांनीं आगरकरांना कॉलेजांत 'फेलो' म्हणून नेमलें. निर्वेधपणें मासिक वेतन मिळूं लागल्यामुळें आगरकरांना एम्. ए. चा अभ्यास करितांना विशेष उल्हास वाटे. हींच दोन वर्षें आगरकरांच्या आयुष्यांतील सुखाचीं व निश्चितपणाचीं अशीं होत. तरीपण पोटाचा

प्रश्न सुटला म्हणून किंवा दारिद्र्यामुळें सोसाव्या लागलेल्या हाल-अपेष्टांचें उट्टें काढावें म्हणून कांहीं दिवस मजा उडवावी हा विचार त्यांच्या मनांत कधींच उद्भवला नाहीं.

* * *

८. एम्. ए. ची परीक्षा उतरल्यावर आगरकरांनीं आपल्या मातुःश्रीस एक पत्र लिहिलें. त्यांत 'एम्. ए. झाल्यावर आपला मुलगा श्रीमंत होईल अशी अपेक्षा करूं नकोस....' असें स्पष्टपणें त्यांनीं कळविलें होतें. यावरून मनाचा खंबीरपणा व संकल्पित कार्याबद्दलची कळकळ स्पष्ट होते.

* * *

९. ज्या विष्णुपंत महाजनींनीं आगरकरांना विद्यार्थि-दशेंत मर्मी बोंचतील असे शब्द उच्चारले त्यांनींच त्यांच्याविषयीं पुढील उद्गार अगदीं मोकळेपणानें काढले आहेत : 'गोपाळराव आगरकरांनीं.... विद्यार्थिदशेंत गरिबीशीं सतत झुंज करून यश संपादिलें होतें व आमरण गरिबींतच आयुष्य कंठून अध्यापकवृत्तीनें पुराण ऋषींचें अनुकरण करून तीस उज्ज्वल करावयाचें असें व्रत घेतलें होतें....'

* * *

१०. १८८० सालीं चिपळूणकरांनीं काढलेल्या न्यू इंग्लिश स्कूलला मिळण्याचें टिळकांबरोबर आगरकरांनीं ठरविलें. टिळक आरंभापासून हजर होते. आगरकर हे एम्. ए. झाल्यावर मिळाले. वामनराव आपटे हे आगरकरांच्या आग्रहावरूनच कायमचे येऊन मिळाले.

* * *

११. १८८१ च्या जानेवारीपासून केसरी व मराठा हीं पत्रें निघूं लागलीं. सुरुवातीपासूनच केसरीचें संपादकत्व आगरकरांचेकडे होतें; व आगरकरांच्या निर्भीड लेखणीमुळें या वर्तमानपत्रांना उच्च

दर्जा अल्पावधींतच प्राप्त झाला, व खपहि वाढत गेला. लोकशिक्षणाचें जें पवित्र कार्य तें आगरकरांना आरंभीं केसरीद्वारें व नंतर **सुधारका**-मुळें करतां आलें. पहिल्या प्रतीचे समाजसुधारक म्हणून त्यांचा लौकिक चोहोंकडे पसरला.

*     *     *

१२. शक्य तितकें निष्कर्जी राहण्याची सात्त्विक मनाची प्रवृत्ति असते, तदनुसार कोल्हापूर-प्रकरणीं झालेल्या शिक्षेच्या मुदतींत आगरकरांनी हॅम्लेटचें मराठी भाषांतर 'विकारविलसित' आरंभिलें. हें पुस्तक लिहून कोर्टापायीं झालेल्या खर्चासाठीं काढलेलें कर्ज देतां यावें हीच बुद्धि त्या वेळीं त्यांचे मनांत होती.

१३. सदरहू प्रकरणामुळे डोंगरीच्या तुरुंगांत असतांना बाळ-गोपाळांनीं एकमेकांशीं नाना विषयांवर विचारविनिमय करून काळ कंठिला. टिळक व आगरकर देहानें दोन असले तरी मनानें एक आहेत अशी सर्व जनतेची खात्री झाली. उत्साही कायदेपंडित टिळक यांनीं हा खटला आपल्यावर ओढवून घेतला व आगरकर मित्रप्रेमाखातर आपण होऊन टिळकांचे साहाय्यक झाले. याला म्हणावें मित्रप्रेम ! 'शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः' अशी ही जोडी होती. पण हें एकदिल फार काळ राहूं शकलें नाहीं.

*     *     *

१४. आगरकरांच्याविषयीं गैरसमज पसरावयाला दुष्ट लोकांनीं कमी केलें नाहीं. पण निग्रही स्वभावाच्या आगरकरांनीं पुढील उद्‌गार काढले. 'लेखणी हातांत धरून तिच्यांतून अर्थबोधक शब्द काढण्याचें सामर्थ्य असेपर्यंत आणि ते वाचण्याला एक तरी वाचक असेपर्यंत असलें स्त्रैण कर्म **सुधारकाच्या** हातून होणार नाहीं.' ही भीष्मप्रतिज्ञा त्यांनीं अक्षरशः शेवटपर्यंत पाळली.

*     *     *

१५. आगरकर हे प्रिन्सिपॉल असतांना फर्ग्युसन कॉलेजची इमारत चतु:शृंगीच्या माळरानांत पुरी होऊन ती उघडण्याचा समारंभ त्या वेळचे इलाखाधिपति लॉर्ड रॅन्ड्हर्स्ट यांच्या हस्तें मोटया थाटानें पार पडला. या प्रसंगीं कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल वा. शि. आपटे हे हयात नाहींत म्हणून आगरकरांचें अंत:करण भरून आलें.

* * *

१६. टिळक व आगरकर या दोघांमध्यें तीव्र मतभेद उत्पन्न होऊन आगरकरांना केसरीशीं असलेला संबंध सोडून देऊन 'सुधारका' ला जन्म द्यावा लागला. आगरकर हे पक्के समाजसुधारक असल्यानें त्यांना अनेक धमक्या येत, पण त्याची त्यांनीं मुळींच पर्वा केली नाहीं.

* * *

१७. १८९०-९१ च्या सुमारास आगरकर पुण्यांत शनिवार पेठेंत ओंकारेश्वराच्या मार्गावर मेहेंदळे यांच्या बागेंतील बंगल्यांत राहत असत व ब्राह्मणांच्या प्रेतयात्रेचा तोच मार्ग असे. पुण्यांतील कांहीं दुष्टांनीं आपला द्वेष इतक्या थराला नेला कीं आगरकरांचें खोटेंच प्रेत त्यांच्या घरावरून मिरवत नेलें. आगरकरांनीं हा सर्व देखावा आपल्या बंगल्यांतून पाहिला. पण त्यांनीं मनाची शांतता यत्किंचितहि ढळूं दिली नाहीं. उलट स्वत:ची प्रेतयात्रा पाहून त्यांना हंसूंच आलें. पण दुसऱ्याच क्षणीं त्यांच्या गंभीर चेहऱ्यावर पुढील विचार उमटल्यास नवल नाहीं :—" Oh Lord ! Forgive them, they know not what they are doing. "

* * *

१८. आगरकरांचा पहिल्या प्रतीचे समाजसुधारक व 'सुधारका'चे संपादक म्हणून चोहोंकडे नांवलौकिक झाला. त्यामुळें त्यांना प्रत्यक्ष पाहावें अशी इच्छा होणें अगदीं स्वाभाविक आहे. तदनुसार एक गृहस्थ त्यांचेकडे त्यांना भेटण्याकरितां—म्हणजे विशेषेंकरून पाहण्या-

करितां—गेला. या वेळीं आगरकर हे फर्ग्युसन कॉलेजच्या आवारांत स्वतः-करितां बांधलेल्या बंगल्यांत रहात, व ते स्वतः बंगल्यापासून अलग अशा खोलींत लिहिण्यावाचण्याकरितां बसत. वरील गृहस्थ जेव्हां गेले त्या वेळीं आगरकर अंगांत धाबळीची बाराबंदी घालून व फक्त पंचा नेसून बसलेले होते. शिवाय याच वेळीं ते केवळ प्रकृतिस्वास्थ्या-करितां औषधी चिलीम ओढीत होते. त्या गृहस्थानें खुद्द आगरकरां-नाच 'आगरकर कोठें आहेत?' म्हणून विचारलें. 'आपलें त्यांच्याशीं काय काम आहे?' असें आगरकरांनीं त्यांना विचारलें. यावर त्या गृहस्थानें 'यांची कीर्ति ऐकून केवळ त्यांना भेटावें म्हणून आलों' इतकें म्हटल्यावर 'मीच तो सुधारकाचा संपादक' असें आगरकरांनीं सांगितलें. त्या गृहस्थास ही गोष्ट खरी न वाटून 'उगीच थट्टा कां करतां?' असें त्यांनीं विचारलें. आगरकरांनींहि 'ही थट्टा नाहीं; तुम्हांला पाहिजे असलेला आगरकर मीच' अशी त्याची खात्री केली.

सारांश आगरकरांची राहणी साधी व सरळ होती. ते जरी सुधारक होते तरी त्यांना डामडौलाची आवड कधीच नव्हती.

* * *

१९. त्यांचा स्वभाव कांहींसा विनोदी होता. विनोदी स्वभावाची माणसें सहसा कुढया मनाचीं नसतात. त्यांचे मनांत कोणत्याहि तऱ्हेचें किल्मिष नसतें. आगरकरांना दम्याची व्यथा असल्यानें त्यांच्या पोटांत कितीतरी प्रकारचीं औषधें गेलीं होतीं. त्यांवर ते एकदां सहज म्हणाले, 'या दम्यासाठीं इतकीं औषधें माझ्या पोटांत गेलीं आहेत कीं, मी मेल्यावर जर माझें पोट एखाद्या वैद्यानें ठेवून दिलें तर त्याच्या हातांत एक दवाखाना आल्यासारखें होईल.'

* * *

२०. विद्यार्थ्यांच्या मनांत आगरकरांबद्दल नेहमीं आदर वसत असे. त्यांचें मन हळुवार पण मोकळें असे. याचा फायदा वर्गांत

विद्यार्थी सुद्धां घेत. एकदां एका विद्यार्थ्यानें त्यांना वर्गांत विचारलें कीं, 'आपण कट्टे सुधारक, आपला देवावर विश्वास नाहीं, मग मिसेस् आगरकरांना देवळांत जाण्याची कशी परवानगी मिळते?' यावर आगरकरांनीं उत्तर दिलें, 'देवळांत जाण्यांत अर्थ नाहीं, असें मी कुटुंबाला घरचेवर सांगतों....मला जसा माझीं मतें बनविण्याचा हक्क आहे तसा तिलाहि आहे....तिचीं मतें बदलण्याचा मला हक्क नाहीं.' हें खात्री पटविणारें उत्तर ऐकून विद्यार्थी गप्प झाले.

* * *

२१. तसेंच एकदां Zigzag शब्दाचा अर्थ समजावून देतांना आगरकरांनीं पुढील स्पष्टीकरण दिलें, 'बैल रस्त्यानें चालतांना कधीं-कधीं मुतत जातो; तेव्हां जमिनीवर जी आकृति पडते तिला नागमोडी किंवा Zigzag म्हणावयाचें.' या उदाहरणानें विद्यार्थ्यांत हंशा पिकला व अर्थहि समजला.

* * *

२२. आगरकर हे १८९५ मध्यें वारले. त्यांच्या पश्चात् ना. गोखल्यांना त्यांच्या घरची पुढची व्यवस्था पाहण्याचा प्रसंग आला. त्यांचें दप्तर धुंडाळीत असतां त्यांत त्यांना एक पैशाची पुरचुंडी आढळली व तिच्यावर एक चिठ्ठी लावलेली होती व त्या चिठ्ठीवर 'माझ्या प्रेत-दहनार्थ' असें लिहिलेलें होतें. हा मजकुर अर्थात् ना. गोखल्यांच्या वाचनांत येऊन त्यांना रडूं कोसळलें! आगरकरांनीं आपण गरीब; आयत्या वेळीं पैशाची अडचण भासूं नये म्हणून सवड होतांच जरूर लागणारी रक्कम बाजूला करून ठेवलेली असावी. मरणासंबंधींच्या गोष्टी निघाल्या कीं, आगरकर म्हणत, 'मी मरणाला तयार आहें. मला लोकांना जें सांगावयाचें तें सगळें मीं सांगून टाकलें आहे.'

* * *

२३. आगरकरांच्या मृत्युलेखांत गोपाळराव गोखले लिहितात, '.... त्यांच्या मृत्यूनें पुणें किंवा महाराष्ट्र येथेंच नव्हे तर सर्व देशास दैन्य आलें आहे ! ....जन्मतःच मोठपणा मिळणें हें एक मोठें भाग्य आहे, परंतु मोठेपणा संपादन करणें हें भाग्य त्याहून थोर आहे....'

* * *

२४. निःस्पृहपणा, सत्यप्रीति, लोकसेवेची आवड, कार्यतत्परता इत्यादि गुणांमुळे आगरकरांचे शत्रूसुद्धां त्यांना जरा वचकून असत. आगरकर हे बोलके सुधारक नसल्यानें त्यांच्या प्रभावी लेखांचा सुपरिणाम लोकांना विचारप्रवण करण्यांत झाला यांत शंका नाहीं. हल्लींच्या त्या विचारांचें कृतींत रूपांतर होत असलेलें दिसून येईल. 'आधीं विचार मग कृति' या पद्धतीनें सध्यां दिसत असणारी समाजसुधारणा ही आगरकरांच्याच शिकवणीचें फळ होय यांत शंका नाहीं.

* * *

२५. आयुष्याच्या उत्तर भागांत टिळक व आगरकर यांमधील मतभेद विकोपाला जाऊन तोंड न बघण्याची वेळ आली तरी दोघांच्याहि अंतःकरणांत मित्रप्रेमाचा झरा आटलेला नव्हता. आगरकरांवरील मृत्युलेख लिहीत असतां टिळकांच्या डोळ्यांतील अश्रु घळघळा वाहत होते ! पूर्वाश्रमीचे ऋणानुबंध लक्षांत घेतां मित्रप्रेमाचा उमाळा आल्याशिवाय कसा राहील ? केसरीचे दोन रकाने भरण्याला टिळकांना चार तासहि पुरले नाहींत असें म्हणतात.

# श्रीमंत सयाजीराव गायकवाड



[त्रोटक जीवन-वृत्तान्तः--१८६३ ते १९३९. श्री. सयाजीराव यांचें मूळचें नांव गोपाळराव गायकवाड असें होतें. गोपाळराव यांचा जन्म नाशिक जिल्हयांतील कवळाणें या गांवीं १७ मार्च १८६३ रोजीं झाला. ते बारा वर्षांचे होईतोंपर्यंत सर्व काळ त्यांनीं इतर सामान्य मुलांप्रमाणें खेडेगांवांत खेळण्याबागडण्यांत घालविला. १८७५ च्या मे महिन्यांत त्यांच्या नशिबानें उचल खाऊन गोपाळराव व त्यांचे ज्येष्ठ व कनिष्ठ बंधु यांची बडोदें राज्याला वारस म्हणून निवड होण्याकरितां बडोदें येथें रवानगी झाली.

महाराणी जमनाबाईसाहेब यांनीं दत्तकाकरितां मधल्या भावाची म्हणजे गोपाळरावांची निवड केल्यामुळें गोपाळराव सयाजीराव बनले! विधिघटना विचित्र म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. ध्यानीमनीं नसतांना गोपाळरावांना राजयोग प्राप्त झाला! वयाचे बारा वर्षांपासून ते अठरा वर्षांपर्यंत त्यांचें शिक्षण होत होतें; पण ते वयांत आल्यानंतर हिंदुस्तान सरकारनें त्यांना सर्वाधिकार देण्याचें ठरविलें. १८८१ च्या डिसेंबर महिन्यांत राज्याभिषेकाचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा झाला. केवळ अठराव्या वयापासून सयाजीरावांवर राज्याची सर्व ज़बाबदारी येऊन पडली. बडोद्याचे त्या वेळचे दिवाण सर टी. माधवराव यांनीं महाराजांच्या शिक्षणाची उत्तम सोय करून त्यांच्या मनावर उच्च संस्कार घडविले. महाराजांचें पहिलें लग्न १८८० सालीं झालें, व महाराणीचें नांव चिमणाबाई असें ठेवण्यांत आलें. राजपुत्र फत्तेसिंहराव जन्माला येऊन दीड वर्ष होतें न होतें तोंच राणीसाहेब कालवश झाल्या. कौटुंबिक आपत्तीचा हा तडाखा महाराजांना फार जाणवला. थोड्याच दिवसांत त्यांचा दुसरा विवाह होऊन या विवाहाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचें दैव त्यांना लाभलें.

महाराजांनीं अगदीं आरंभापासून प्रत्येक गोष्टींत मन घालून तिचा खोलवर अभ्यास करून अनेक सुधारणा केल्या. महाराजांचें चरित्र म्हणजे एक प्रकारें बडोद्याच्या विविध सुधारणांचा इतिहासच होय. प्रजेच्या हिताकरितां शब्दशः तन-मन-धन अर्पण करणारा राजा म्हणून सयाजीरावांचें उदाहरण बिनधोकपणें देतां येईल. त्यांनीं राज्ययंत्रांतील भाग न् भाग निरीक्षण करून त्याची सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न आमरण केला. शेतसाऱ्याच्या विविध पद्धति, ग्रामपंचायतीचें पुनरुज्जीवन, न्यायदानाची पुनर्घटना, बालविवाहाची बंदी, पुनर्विवाहाला संमति, अगतिक प्रसंगीं काडीमोडीची सोय, प्राथमिक शिक्षणाची सक्ति, धंदे-शिक्षणाला उत्तेजन, अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे सक्रिय सहानुभूतिपूर्वक लक्ष, प्रजेच्या उपयोगाकरितां वाचनालयें व पुस्तकालयें अशा अनेक बाबतींत जातीनें लक्ष घालून त्यांनीं सुधारणांचा लख्ख प्रकाश बडोद्यांत पाडला.

महाराजांनीं विलायतच्या चोवीस सफरी करून प्रत्यक्ष निरीक्षणानें अनेक गोष्टींचें ज्ञान संपादन केलें. राजे, महाराजे, मुत्सद्दी, विद्वान,

संशोधक, वाङ्मयसेवक यांच्याशीं विचारविनिमय करून अनेक विषयांवर अधिकारवाणीनें बोलतां यावें इतकी तयारी महाराजांनीं केली होती. अमेरिकेंत भरलेल्या जागतिक परिषदेचें अध्यक्षस्थान महाराजांनाच देण्यांत आलें होतें; यावरून त्यांची योग्यता जगानें ओळखली होती यांत शंका नाहीं. हिंदुस्तानच्या व्हाइसरायांनीं व त्यांचें अनुकरण करणाऱ्या इतर अधिकाऱ्यांनीं महाराजांवर अनेक बालंटें आणण्याचा प्रयत्न केला; पण महाराजांची राजनिष्ठा अढळ असल्यानें त्यांनीं सर्व प्रसंगांना धिम्मेपणानें व तितकेंच बाणेदारपणानें तोंड दिलें. महाराजांच्या राज्याभिषेकाचा हीरक-महोत्सव साजरा झाला, इतकें दीर्घायुष्य त्यांना लाभलें हें बडोदेकरांचें खरोखर भाग्य होय. बडोद्याच्या प्रजेला महाराजांचें विस्मरण कित्येक पिढ्या लोटल्या तरी होणें शक्य नाहीं, इतक्या खोलपर्यंत त्यांच्या भरीव सुधारणेचा परिणाम दिसून येणारा आहे.

महाराजांना राजेपण विसरून जाण्याची लहर अनेक वेळां येई. त्यांच्या इंग्लिश चरित्रकारानें पुढील उद्गार त्यांच्याजवळ काढल्याचें लिहिलें आहे, 'Let us go for a walk and be *ordinary mortals* for a while'. सतत उद्योग व दीर्घोद्योग हें तर त्यांच्या जीवनाचें सार आहे. एके प्रसंगीं त्यांनीं असे उद्गार काढले कीं, 'अहो, हा उद्योग पाठीवर आहे, म्हणूनच मी जगूं शकतों. उद्योग नसेल तर मनुष्यानें जगावयाचें तरी कसें!' महाराज नेहमीं धीर, गभीर असे दिसत. त्यांचें मन कोणत्या ना कोणत्या तरी गहन विचारांत गढलेलें असावयाचें. बुद्धीची विशालता व तीव्रता, प्रदीर्घ काळाचा अनुभव, विविध विषयांचें ज्ञान आणि देशाटनें यांमुळें त्यांचे विचार एकांगी किंवा एकदेशीय न राहतां त्यांना जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय असें स्वरूप येई. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या थोर विभूतींत महाराजांना मानाचें स्थान प्राप्त झालें यांत शंका नाहीं. बडोद्याचें राज्य म्हणजे महाराजांची एक प्रयोगशाळा. येथील यशस्वी प्रयोग त्यांनीं जगाला सांगावेत आणि सूज्ञ सूत्रचालकांनीं अन्यत्र ते करून पाहावेत अशा योग्यतेचे श्रीमंत सयाजीराव महाराज आयुष्यांतील चोख रीतीनें बजाविलेल्या थोर कर्तव्याकडे पूर्ण समाधानाची दृष्टि टाकीत निजधामाला निघून गेले!]

**१. गोपाळरावांचे ‘सयाजीराव’ कसे झाले**—मल्हारराव गायकवाड यांना पदच्युत केल्यानंतर ‘गायकवाड’ घराण्यांतीलच एक तरतरीत मुलगा दत्तक घेण्याचें जमनाबाईंनीं ठरविलें. यासाठीं काशीराव गायकवाड यांच्या तिन्ही मुलांना जमनाबाईंच्या पुढे उभे करण्यांत आलें. पहिला मुलगा फार मोठा व धाकटा मुलगा फार लहान म्हणून मधला गोपाळ याची निवड करण्यांत आली. त्याची तरतरीत मुद्रा व चमकदार डोळे हें कोणाच्याहि नजरेंत भरण्यासारखेंच होतें. हेंच गोपाळराव **सयाजीराव** बनले! ध्यानीं मनीं नसतांना अकल्पित रीतीनें कांहीं गोष्टी कशा घडून येतात याचें हें उत्तम उदाहरण आहे.

* * *

२. अशी दंतकथा सांगतात कीं, तिन्ही भाऊ जेव्हां जमनाबाईंच्या पुढें उभे करण्यांत आले, तेव्हां त्यांनीं सर्वांना “तुम्हीं येथें कशाकरितां आलांत?” असा प्रश्न टाकला; पण थोरल्या व धाकट्या भावांना याचें कांहींच उत्तर देण्याचें सुचलें नाहीं. छोट्या गोपाळनें मात्र ‘मी बडोद्याचा राजा होण्याकरितां येथें आलों आहे’, असें धिटाईनें उत्तर दिलें. या उत्तराचाहि त्यांच्या मनावर इष्ट परिणाम झाला.

* * *

३. दत्तकविधानाचा समारंभ मोठ्या थाटानें करण्यांत आला. गोपाळरावांचें नांव ‘सयाजीराव’ असें ठेवण्यांत आलें. हे तिसरे सयाजीराव होत. छोट्या सयाजीरावांना बडोद्याच्या रेसिडन्टांनीं उचलून गादीवर बसविलें. नंतर तोफांच्या सलामी होउन त्यांनीं मानकऱ्यांचे मुजरे घेतले. पहिला मुजरा त्यांनीं जन्मदाते श्रीमंत काशीरावांचा घेतला. वडिलांनीं महाराजांना मुजरा करतांच महाराजांच्या अंत:करणांत अनेक मिश्र भावनांची खळबळ उडून गेली असल्यास नवल नाहीं.

* * *

४. गायकवाड घराण्याचें मूळचें उपनांव 'मत्रे' होय. याचेंच पुढें मंत्री असें रूपांतर झालें. गायकवाड कुटुंबांतील कांहीं लोक अद्यापिहि 'मंत्री गायकवाड' असें आडनांव लावतात. पण गायकवाड हें नांव कसें पडलें? त्याची हकीकत अशी सांगतात कीं, या घराण्यांतील एका पुरुषानें वाघाच्या तावडींत सांपडलेली एक गाय मोठ्या शिताफीनें सोडविली व तिला आपल्या घराच्या 'कवाड्याच्या' आड आणून तेथें बांधली. गाय + कवाड यांच्या परस्पर संबंधामुळे त्यांना **गायकवाड** हें नांव प्राप्त झालें !

* * *

५. जीवावर बेतलें पण नशिबानें वांचविलें ! गोपाळराव लहान असतां रस्त्यावर इतर सवंगड्याबरोबर खेळत होते. समोरून एक पोळ जोरानें धांवत आला व पोळानें छोट्या गोपाळाला आपल्या शिंगावर घेतलें व तो तसाच धांवत सुटला. त्यांच्या सोबत्यांनीं आरडाओरड केली. मंडळीहि जमली; पण पोळ कांहीं आवरेना. दैववशात् समोरून त्यांचे वडील काशीराव येत होते. त्यांनी बैलानें एका मुलाला शिंगावर घेतलेलें पाहिलें. लगेच अरुंद रस्त्याच्या मध्यावर पवित्र्यांत उभे राहून पोळाचीं शिंगें पकडलीं व त्याला खालीं वांकविलें. शिंगावरील मुलानें अलगत सुरक्षितपणें उडी मारली. काशीराव मुलाकडे बघतात तों गोपाळच त्याच्या नजरेस पडला ! दैवाचीच खैर म्हणून मुलगा वांचला.

* * *

६. राजे झाल्यानंतर सयाजीरावांना जन्मदात्या वडिलांची अनेक वेळां आठवण होई. पण त्यांची वारंवार गांठ पडण्याची मोठी मुष्कील ! महाराजांनीं आपलें राजेपण कधीहि विसरूं नये याबद्दल विशेष खबरदारी घेण्यांत येई. त्यामुळें त्यांना मंडळींत असूनहि एकटेंच असल्यासारखें वाटल्यास नवल नाही. भोंवतालचें वातावरण-

केवळ औपचारिकपणानें भारलेलें असल्यामुळें त्यांच्या जीवाला खुले-पणा फार थोडा लाभला.

* * *

७. पुढील संवाद विशेष उद्बोधक वाटेल—

महाराजांना शिकवूं पाहाणारे गृहस्थ—'आपला जन्म मराठ्यांचे कुळांत झाला. आपण मराठे आहांत, त्यांच्याकरितां आपण कांहींतरी विशेष असें केलेंच पाहिजे.

महाराज उत्तरले:—'मी सर्वांना सारखें लेखतों. मराठ्यांना किंवा इतर जातींना मी सवलती दिल्या आहेत; त्या एवढ्याकरितां कीं, त्यांनीं शिकून इतर जातींच्या बरोबरीला यावें. यापेक्षां मला कांहीं जास्त करतां येत नाहीं.'

गृहस्थ:—'आपण एखादी 'पॉलिसी' (आपलें धोरण) प्रसिद्ध कां करीत नाहीं?'

महाराज:—'माझी पॉलिसी अशी कीं आपल्यासारखे लोक आमच्याकडे जितके कमी येतील तितकें बरें!'

वरील उत्तरानें ते गृहस्थ किती खजील झाले असतील याची कल्पनाच करणें युक्त!

* * *

८. शिक्षणासंबंधीं महाराजांचे पुढील उद्गार मननीय वाटतील—

"कोणत्याहि राजाचें शिक्षण त्याच्या अधिकाऱ्यांपेक्षां अधिक असलें पाहिजे मात्र तें केवळ पुस्तकी नसून अनुभविक हवें....राजा झाला तरी ज्ञानाची शिदोरी बांधून देतां येत नाहीं....."

"संस्कृत भाषा ही मराठी व गुजराथी या भाषांचें मूळ असल्यानें ....ती प्रत्येकाला आलीच पाहिजे....'

"मॅट्रिक्युलेशनपर्यंतचें शिक्षण हें कोणत्याहि मनुष्याला किमान-पक्षीं मिळालेंच पाहिजे.'

९. महाराजांचा विवाह त्यांचे वयाच्या सतराव्या वर्षी म्हणजे त्या काळाच्या मानानें उशिराच झाला. तंजावरच्या राजघराण्यांतील मोहिते यांच्या कन्या लक्ष्मीबाई यांना सर्वांनीं पसंत केल्या. लग्नसोहळा थाटाचा झाल्यास त्यांत आश्चर्य कांहींच नाहीं! त्यांच्या लग्नाप्रीत्यर्थ ६,५८,०२५ रुपये इतका खर्च झाला! लग्नांत लक्ष्मीबाईचें नांव ' चिमणाबाई ' असें ठेविलें.

* * *

१०. इ. स. १८८३ सालीं महाराजांना पुत्रप्राप्ति झाली. गेल्या चार पिढयांत औरसपुत्र संतति नसल्यामुळें सर्व बडोदेकरांना पुत्र-लाभामुळें अतिशय आनंद झाला. मुलाचें नांव 'फत्तेसिंहराव' असें ठेवण्यांत आलें. त्यावेळीं सर्व शहरभर हत्तीवरून साखर वांटण्यांत आली. महाराणी जमनाबाई यांना तर इतका आनंद झाला कीं, शुभ-वार्ता आणणाऱ्याला त्यांनीं गळयांतील मूल्यवान कंठा काढून दिला!

* * *

११. महाराजांच्या अठराव्या वर्षी हिंदुस्थान सरकारनें त्यांना सर्वाधिकार देण्याचें ठरविलें. अशा रीतीनें संपूर्ण अधिकार व अनियंत्रित सत्ता त्यांच्या हातीं आली. या अधिकाराचा उपयोग महाराज कसे करतात इकडे प्रजेचें लक्ष लागणें स्वाभाविक होतें.

* * *

१२. महाराज दत्तक जाईपर्यंत त्यांना शिक्षणाचा गंधहि नव्हता. पण राज्याभिषेक झाल्यानंतर म्हणजे बाराव्या वर्षापासून त्यांच्या प्राथ-मिक शिक्षणाला सुरवात झाली आणि अधिकार प्राप्तीपर्यंत म्हणजे अठराव्या वर्षापर्यंत शिक्षणक्रम चालू होता. अवघ्या सहा वर्षांच्या अवधींत त्यांनीं निरनिराळ्या भाषांचें ज्ञान व राजाला उपयोगी पडणाऱ्या विविध विषयांचें ज्ञान पैदा केलें. त्यांच्या बौद्धिक व शारीरिक

शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यांत आलें होतें. महाराजांनींहि पुढील जबाबदारी ओळखून अभ्यासांत कधींच कुचराई केली नाहीं.

* * *

१३. आरंभींच्या प्रवासांत महाराजांचा परिवार खूप मोठा असे. एके प्रसंगीं त्यांच्या परिवारांत २३६७ लोक होते. कलकत्त्याच्या सफरींत महाराजांच्या बरोबर ७००।८०० लोकांचा परिवार होता.

* * *

१४. ग्वाल्हेरच्या अनुभववृद्ध महाराजांनीं तेथील मुक्कामांत सयाजीरावांच्या सर्व हालचालींवर विशेष नजर टेविली होती. शेवटीं त्यांनीं आपला अभिप्राय पुढील शब्दांत व्यक्त केला—"महाराजांची (श्री. सयाजीरावांची) बुद्धि, चौकसपणा व प्रौढ वागणूक पाहून मला फार संतोष झाला....बडोदें राज्याला पुढें फार चांगले दिवस येणार आहेत अशी माझी मनोदेवता मला सांगते." १८८६ सालीं गव्हर्नर जनरलर यांनीं बडोद्यास भेट देऊन सयाजीरावांसंबंधीं पुढील अन्वर्थक उद्‌गार काढले—"बडोदें राज्याला एक सूज्ञ, थोर, व सदसद्विवेकी अधिपतीची जोड मिळाली अशी माझी खात्री झाली."

* * *

१५. महाराजांचें आपल्या पत्नीवर विशेष प्रेम असे. महाराणी चिमणाबाईसाहेब यांनीं इहलोकची यात्रा १८८५ सालीं संपविली. याचा परिणाम महाराजांच्या मनावर इतका झाला कीं, त्यांची निद्रा नाहींशी होऊन त्यांना निद्रानाशाचा रोग जडला. त्यांनीं दुसरें लग्न केलें व विलायतच्या अनेक सफरी केल्या तरी या रोगानें त्यांना अखेरपर्यंत सोडलें नाहीं.

* * *

१६. देश उद्योगप्रधान असल्याशिवाय त्याची प्रगति होणें कठीण म्हणून महाराजांनीं आपल्या राज्यांत अनेक उद्योगधंदे व

कारखाने सुरू करण्याचें ठरविलें. बडोदें येथील सुताची गिरणी, साखरेचा कारखाना, कौलें तयार करण्याचा कारखाना इ. उद्योगधंदे सरकारी पैशांची सढळ हातानें मदत करून त्यांनीं आरंभिले. तसेंच औद्योगिक शिक्षण देणाऱ्या '**कलाभवना**' सारख्या संस्था त्यांच्याच प्रोत्साहनानें अस्तित्वांत आल्या. राजाश्रय असल्याशिवाय उद्योग-धंद्यांना उर्जितावस्था येऊं शकत नाहीं हा सार्वत्रिक अनुभव आहे.

* * *

१७. विलायतच्या एका सफरींत महाराज हे व्हिक्टोरिया राणीच्या विंडसर राजवाड्यांत कांहीं दिवस पाहुणचार घेण्याकरितां राहिले होते. बडोदें संस्थानच्या अधिपतींची योग्यता सर्वांना कळून चुकल्यामुळें ते जातील तेथें त्यांचा योग्य तो मानमरातब राही.

* * *

१८. हिंदुस्तानचे व्हाइसराय लार्ड कर्झन यांनीं दिल्लीला मोठा दरबार भरविण्याचें ठरविलें. या प्रसंगीं हिंदुस्तानांतील संस्थानिकांची हत्तीवरून मिरवणूक काढण्याचा कार्यक्रम ठरविला व संस्थानिकांकडून या कार्यक्रमाबद्दल त्यांचें स्पष्ट मत मागविलें. बडोद्याच्या महाराजांनीं 'हत्तीवरील मिरवणुकींत भाग घेणें स्वतःला गैरसोयीचें होईल,' असें प्रांजलपणें आपलें मत कळविलें. यावर त्यांना असें कळविण्यांत आलें कीं, 'तुमच्या उत्तरानें वरिष्ठ सरकारचा अपमान होतो.' यावर महाराजांनीं स्पष्टपणें पण विनयानें पुढील उत्तर धाडलें—'स्पष्ट अभिप्राय कळविल्यानें जर आपला अपमान होतो, तर मग स्पष्ट अभिप्राय मागविण्यांतच कां आला? वस्तुतः महाराजांच्या मनांत सार्वभौम बादशहाचा अपमान करण्याची बुद्धि कधींच वसली नाहीं.

* * *

१९. १९११ च्या डिसेंबर महिन्यांत १२ तारखेला दिल्ली येथें मोठा दरबार भरविण्यांत आला. या वेळीं हिंदुस्थानचे बादशाह सातवे

एडवर्ड व महाराणी मेरी यांच्या स्वाऱ्या उपस्थित होत्या. सयाजीराव गायकवाड हेही या समारंभाला हजर होतेच. यांची मुजरा करण्याची वेळ येतांच, ते बादशहांना मुजरा करून परत जागेवर येऊन बसले. परत येतांना मध्यंतरीं विशेष कांहीं गोष्टी घडल्या याची जाणीवही त्यांना नव्हती, पण समारंभानंतर महाराजांच्या कानावर त्यांच्याविरुद्ध वातावरण पसरल्याचें वर्तमान ना. गो. कृ. गोखले यांनीं घातलें. या वेळीं महाराजांना मोटा अचंबा वाटला! कारण त्यांच्याकडून बुद्धिपुरस्सर अशी कोणतीच गोष्ट झालेली नव्हती. पण तडफदार आणि स्वतंत्र बाण्यानें राज्य करणारे सयाजीराव यांच्या प्रभावी राज्ययंत्राकडे दोषैक दृष्टीनें बघणाऱ्याला, महाराजांनीं परत फिरतांना बादशहांना पाठ दाखविली, महाराणी मेरी यांना स्वतंत्र मुजरा केला नाहीं इ. गोष्टी दिसल्या. इंग्लिश वर्तमानपत्रकारांनीं राईचा पर्वत केला आणि महाराजांच्या राजनिष्ठेवर ठपका ठेवला! अशा रीतीनें प्रक्षुब्ध वातावरण टीकाकारांनीं पसरविलें!

त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांनीं महाराजांनीं पाठविलेलें दिलगिरीचें पत्र त्यांच्याच अनुमतीनें प्रसिद्ध केलें; पण खुद्द व्हाइसरायांचे बंधु यांनीं यासंबंधीं कांहीं महिन्यानंतर एक असा खुलासा केला कीं, दरबारची हकीकत घडली त्यावेळीं मी महाराजांपासून वीस यार्डांच्या आंत होतों. यावरून मी स्वतः सांगू शकतों कीं, सर्व प्रकरणाची निव्वळ अतिशयोक्ति करण्यांत आली आहे. खुद्द इंग्लंडच्या दरबारांत....कित्येक अधिकारी व स्त्रिया यांना राजेसाहेब व राणीसाहेब यांच्या जवळून चुकून मुजरा केल्याशिवाय धांवत जातांना मीं पाहिलें आहे....

२०. महाराजांनीं आपल्या राज्यांतील अधिकारी स्वयंस्फूर्तीनें कार्यप्रवण व्हावेत व अनेक सुधारणा अंमलांत येऊन प्रजा सुखी राहावी या

हेतूनें अधिकाराचें विकेंद्रीकरण (Decentralization of Power) केलें. निरनिराळ्या प्रांतांच्या अधिकाऱ्यांना पुष्कळसे अधिक अधिकार देऊन त्यांनीं आपापल्या प्रांताच्या हिताहिताकडे विशेष लक्ष द्यावें, असें सुचविलें. असें करण्यानें प्रांताधिकाऱ्यांना पूर्ण स्वतंत्रता लाभली.

*   *   *

२१. पुष्कळसा पैसा लोकोपयोगी कामें करण्याला हातीं असावा या हेतूनें अवास्तव होणारा खर्च कमी करावा असें महाराजांनीं सुचविलें.

(अ) दानधर्माच्या अनेक प्रकारांपैकीं हिंदूंना खिचडी व मुसलमानांना ‘ग्यारमी’ ( शिजविलेला भात व मांस ) देण्याचा प्रघात असे; आणि त्याप्रीत्यर्थ लाखों रुपये खर्च होत ! पण या दानानें रिकामटेकड्या ऐतखाऊंना निरुद्योगी राहण्याला प्रोत्साहन दिल्यासारखें होतें, म्हणून दान घेणाऱ्याची लायकी पाहूनच हें अन्नदान करण्यांत यावें, असें महाराजांनीं फर्माविलें.

(ब) विद्वान ब्राह्मणांना प्राचीन विद्या व संस्कृति चालू ठेवल्याबद्दल दक्षिणा वांटण्यांत येई. महाराजांनीं नव्या-जुन्या विद्वानांची एक समिति नेमून तिला या रकमेचा विनियोग अधिक योग्य रीतीनें कसा करतां येईल याचा विचार करण्याला सांगितलें.

(क) इतकेंच काय, पण योग्य त्या ठिकाणीं काटकसर करण्यासंबंधीं महाराजांनीं पुढील हुकूम काढला—‘**खुद्द हुजूर स्वारीचा खर्च फार मोठा आहे.**’ अशा स्वाऱ्या नेहमीं झाल्या तर खर्चाची बाब मोठी होणार आहे, हें चांगलें नाहीं. याचा विचार खाजगी कारभारी यांनीं करून कमी खर्चाचा रस्ता दाखविला पाहिजे.’

(ड) त्यांनीं दत्तक मातुश्रींना त्यांच्या दानधर्माच्या वाढत्या प्रवृत्तीबद्दल अत्यंत विनयानें व आदरानें एका पत्रांत असें सुचविलें कीं, ‘मजकडून आपणांस जितकें सुख देववेल तितकें देणें हा माझा

धर्म आहे. परंतु आपणहि आपली सर्व व्यवस्था हल्लींपेक्षां जास्त चांगली ठेविली पाहिजे कीं ज्याच्या योगानें कर्ज होणार नाहीं. दुनिया चमत्कारिक आहे; परन्तु **ती आपले संबंधानें कशी असावी हें थोडेसें आपल्या हातीं आहे.'**

२२. महाराजांच्या भोजनांत मांसाहाराचें प्रमाण फारच थोडें असे. मांसाहारानें बुद्धिमांद्य येतें असें त्यांचें मत होतें. त्यांच्या जेवणांतील मौज अशी कीं, सुवर्णपात्रांत पंचपक्वान्नें वाढलेलीं असलीं तरी त्यांत बाजरीची भाकरी ही असावयाचीच ! यांतील हेतु कांहींहि असो, पण ही प्रथा अव्याहत चालू होती एवढी गोष्ट खरी.

२३. **तीन महोत्सव :** महाराजांना संपूर्ण अधिकार प्राप्त होऊन पंचवीस वर्षें पुरीं झाल्यानें त्याबद्दलचा **रौप्य महोत्सव** साजरा करण्यांत आला. त्या वेळीं प्रजेनें दिलेल्या मानपत्राला उत्तर देतांना महाराज म्हणाले. 'तुमचें कल्याण हेंच माझें कर्तव्य व तोच माझा मोक्ष, असें मी समजतों." १९२५ सालीं महाराजांच्या राज्याभिषेकाला पन्नास वर्षें झाल्यानें प्रजेनें **सुवर्ण महोत्सव** साजरा केला, या प्रसंगीं त्यांची मिरवणूक हत्तीवरून सोन्याच्या अंबारींतून काढली. त्याला उत्तर देतांना महाराजांनीं अत्यंत थोरपणाचें उद्गार काढले—"थोरपणा हा मुख्यत: शीलांत असतो. त्यांचे मुख्य गुण म्हणजे खरेपणा, नि:स्वार्थीपणा, दूरदर्शीपणा व निरलसपणा हे होत.... या गुणांमुळें थोर पुरुष अढळ व अविकृत राहतात. अशा पुरुषांना आरोग्य व ऐश्वर्य ही केवळ जनतेची सेवा करण्याचीं साधनें वाटतात ....अशा थोरपणाला जातपात नसते....तो गुणावर अवलंबून असतो."

सुवर्ण महोत्सव साजरा झाल्यावर दहा वर्षांनीं हीरक महोत्सव साजरा करतात. महाराजांच्या राज्याभिषेकाचा **हीरकमहोत्सव** साजरा करण्याची संधि लाभली हें त्यांचें व प्रजेचें नशीबच !

महाराज या वेळीं युरोपांत होते. या शुभ प्रसंगीं बादशहा पंचम जॉर्ज व स्टेट सेक्रेटरी सर सॅम्युअल होअर यांनीं शुभ संदेश पाठविले. सर सॅम्युअल आपल्या संदेशांत म्हणतात. .... 'कोणाहि हिंदी संस्थानिकाचा हीरक महोत्सव समारंभ झाला आहे किंवा नाहीं, हें मला माहीत नाहीं. पण माझी अशी खात्री आहे कीं, इतक्या दीर्घ कालीन भूतकालाकडे **संपूर्ण समाधानाच्या भावनेनें** अवलोकन करण्याचा अधिकार मात्र आपल्या शिवाय कोणालाहि प्राप्त होणार नाहीं.

* * *

२४. कर्झन साहेबांनीं एक खलिता प्रसिद्ध करून सर्व संस्थानिकांना असें सुनावलें कीं, संस्थानिकांनीं वारंवार परदेशांत जाणें हें त्यांचें योग्य वर्तन न समजतां कर्तव्यभंग म्हणून समजलें जाईल...." तरीपण महाराजांनीं **चोवीस** वेळां विलायतच्या सफरी केल्या! राज्यांतील सुधारणांच्या वैभवाकडे व विविधतेकडे दृष्टिक्षेप केल्यास त्या सफरी निष्फळ झाल्या असें म्हणण्यास कोण धजल?

* * *

२५. महाराजांनीं आपलें अध्ययन एकांगी न ठेवितां विविध विषयांसंबंधीं खोल ज्ञान संपादण्याकडे लक्ष पुरविलें होतें. चौरस ज्ञानार्जन केल्यानें कोणत्याहि परिषदेचें मानाचें अध्यक्षस्थान त्यांना देण्यांत येई. लंडन विश्वविद्यालयाच्या मुख्य दिवाणखान्यांत जगांतील अनेक सरकार, राजे, मुत्सद्दी, विद्वान् यांच्या सहानुभूतीनें एक अभूतपूर्व अशी जागतिक परिषद् भरविण्यांत आली. या परिषदेचें अध्यक्षस्थान सर्वानुमतें महाराजांनाच देण्यांत आलें. यावरून त्यांच्या कर्तृत्वाला एक प्रकारें जगमान्यता मिळाली होती असें दिसून येईल. तसेंच जागतिक धर्मपरिषद् व सर्व धर्मपरिषद् यांच्या शेवटच्या संयुक्त अधिवेशनाचें अध्यक्षस्थान महाराजांनीं मंडित केलें होतें. हा अपूर्व

मान हिंदी संस्थानिकाला अमेरिकेंत मिळाल्याबद्दल कोणा हिंदूचें अंत:करण भरून येणार नाहीं ? या प्रसंगीं श्रोतृगण सव्वीस हजारावर होता. या वेळीं महाराजांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत आरंभीं पुढील उद्‌गार काढले—'आपण माझा सन्मान करतांना माझी मातृभूमि व **सर्व धर्मांची मातामही जी हिंद्‌माता,** तिचाच सन्मान केला असें मी समजतों....'

* * *

२६. महाराजांनीं आपल्या राज्यांत प्रत्येक बाबतींत लक्ष घालून सुधारणा घडवून आणली. कित्येक बाबतींत तर ब्रिटिश हिंदुस्तानांत नसलेल्या सुधारणा त्यांनीं घडवून आणल्या. उदा०, हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें विधिपूर्वक झालेलें लग्न केव्हांहि रद्द करतां येत नाहीं, अशी प्रथा होती. पण महाराजांनीं सर्व बाजूंनीं विचार करून त्या प्रथेला पहिला धक्का दिला. व 'हिंदु लग्न विच्छेद' (Divorce) म्हणजे काडीमोडीसंबंधींचा एक नवीन कायदा त्यांनीं अमलांत आणला.

* * *

२७. राजपुत्र जयसिंहराव यांचें निधन हॉलंड देशांत झालें. त्या वेळीं रूटरनें 'बडोद्याचे गायकवाड वारले' अशी बातमी चोहोंकडे पाठविल्यानें सयाजीरावच वारले असा गैरसमज सर्वत्र पसरला. आणि वर्तमानपत्रकारांनीं अग्रस्थानीं मृत्युलेख लिहिले ! ! ! या वेळीं सयाजीराव सेंट मॉरिस येथें होते. सर्व संपादकांनीं महाराजांविषयीं धन्योद्‌गार काढले होते. अशा रीतीनें स्वत:विषयीचे मृत्युलेख प्रत्यक्ष महाराजांना वाचावयास मिळाले. 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां' या उक्तीचा अनुभव त्यांनीं घेतला.

१४७६
IRBK-0101476
IRBK-0101476

म. ग्रं. सं. ठाणें.


# 'टीचर्स पब्लिशिंग हाउस'चीं

## कांहीं पुस्तकें :

(१) आशियांतील मुलें—किंमत ११ आणे.
ले.—शं. भा. गोंधळेकर, एम्. ए., बी. टी.

(२) मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी—पुस्तक १ लें
किंमत ६॥ आणे. ले. शं. भा. गोंधळेकर,
एम्. ए., बी. टी.

(३) मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी—पुस्तक २ रें
किंमत ६॥ आणे. ले.—शं. भा. गोंधळेकर,
एम्. ए., बी. टी.

(४) युरोपचे आधारस्तंभ—किंमत १२ आणे.
ले.—गो. अ. मोडक, बी. ए.

(५) अर्वाचीन भारतीयांच्या कथा—पुस्तक पहिलें
महाराष्ट्र कि. ५॥ आणे. ले. शं. दा. चितळे,
एम्. ए., बी. टी.

**पुस्तकें मिळण्याचें ठिकाण**—५०४ सदाशिव पुणें २.


कव्हर छपाई आर्यसंस्कृति मुद्रणालय, पुणें.